POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३२७ ● मुंबई, शनिवार, २८ जून २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## हिंदीच्या मुद्द्यावर महायुतीमध्ये मतभेद... नेमकी भूमिका काय?

**■मुंबई I प्रतिनिधी :**

हिंदीवरून महायुती सरकारमध्ये मतभेद पाहायला मिळत आहेत. भाजप आणि शिवसेना शिंदे गटाची भूमिका एकच आहे. राज्यात हिंदीची सक्ती नाही, तर मराठीची सक्ती आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे, तर अनिवार्य असा शब्द आम्ही हटवला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. मात्र दुसरीकडे पहिली ते चौथी हिंदी नकोच अशी थेट भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली आहे.

हिंदीच्या वादावरून शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले आहेत, मात्र दुसरीकडे हिंदीच्या वादावरून सरकारमध्ये मतभेद असल्याचं पाहायला मिळत आहे. पहिली ते चौथी हिंदी नकोच अशी भूमिका अजित पवार यांची आहे, तर राज्यात मराठीची



सक्ती आहे, हिंदीची सक्ती नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. दुसरीकडे अनिवार्य शब्द हटवण्यात आला आहे, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. सरकारमध्ये असून अजित पवार यांचा हिंदीला विरोध आहे.

गुरुवारी मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली मला असं वाटतं पहिली, दुसरी, तिसरी, चौथीमध्ये हिंदी असू नये, पाचवीपासून हिंदी असावं. पहिलीपासून मराठी भाषाच असावी, त्यांना मराठी शिकवावी. ज्यावेळी ते पहिलीपासून मराठी भाषा लिहायला आणि वाचायला शिकतात तेव्हा त्यांना हिंदी भाषा देखील लिहिता वाचता येते. फक्त बोलण्याच्या संदर्भात पाचवीपासून सुरुवात केली तरी काही हरकत नाही. तेव्हा पाचवीपासून हिंदी सक्तीची करावी.

तर दुसरीकडे यावर आक्षेप घेणाऱ्यांशी बोलून निर्णय घेऊ, अनिवार्य शब्द काढला आहे, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. त्यामुळे शिंदे यांची भूमिका ही भाजपला सुसंगत अशीच आहे. या सर्व घडामोडींवर एकनाथ शिंदे यांचे मंत्री दादा भुसे यांनी राज ठाकरे यांची देखील भेट घेतल्याचं पाहायला मिळालं. मात्र या संदर्भात अजित पवार यांची वेगळी भूमिका असल्याचं पाहायला मिळत आहे.

## राज्यातील ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

### तेजस्वी सातपुतेंना नवी जबाबदारी, पुण्यात ३ नवे आयपीएस

**■मुंबई I प्रतिनिधी :**

राज्यातील महायुती सरकारकडून गेल्या काही महिन्यात आएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका लावण्यात आल्याचं पाहायला मिळत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सातत्याने बदल्या होत असून आता तब्बल ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये, पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, धुळे, हिंगोली, जळगाव येथील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यामध्ये, पुण्यातील शस्त्र निरीक्षक शाखा पोलीस अधीक्षकपदी असलेल्या तेजस्वी सातपुते यांची समादेशकपदी बदली करण्यात आली आहे. पुणे राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ पदावर त्यांना नियुक्ती देण्यात आली आहे. तर, महेंद्र पंडित यांची स्तंभ २ मधून स्तंभ ३ मध्ये नमूद पदावर बदली करण्यात आली आहे. त्यानुसार, महेंद्र पंडित यांना बृह्मुंबई पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात




आली आहे.

कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक तुषार पाटील यांची मुंबईत पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, विजय पवार, सुनिल लोखंडे, नम्रता पाटील आणि स्मिता पाटील यांची मुंबईतील पोलीस उपायुक्त पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. म्हणजेच मुंबईतील पोलीस उपायुक्त पदावर ५ आयपीएस अधिकाऱ्यांची पदोन्नतीवर नेमणूक करण्यात आली आहे.

राज्यभरातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून तब्बल ८१ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून ५१ आयपीएस अधिकाऱ्यांना काहींना प्रमोशन तर काहींचे डिमोशन करुन बदली करण्यात आली आहे. पुण्यातील परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांची पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा येथे बदली करण्यात आली असून वाहतूक पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांची देखील बदली करण्यात आली आहे. सरकारच्या नव्या बदली आदेशान्वये पुण्यामध्ये तीन नव्या आयपीएस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. दरम्यान, राज्यात गेल्या १५ दिवसांपूर्वी ८ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यानंतर गेल्या आठवड्यात पुन्हा चार आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश जारी करण्यात आले होते. त्यामध्ये मुंबई मेट्रो क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांची वर्ध्याच्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी बदली करण्यात आली आहे. तर अमरावतीचे आयुक्त सचिन कळंत्रे यांची बदली पुण्यातील यशदाचे उपसंचालकपदी करण्यात आली. त्यानंतर, आता ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्याआहेत.

## ठाकरे बंधूंची बातमी दिल्लीपर्यंत पोहचवली

### पहिले मराठीत, मग इंग्रजीत घोषणा...

## संजय राऊतांनी थेट अमित शाह अन् देवेंद्र फडणवीसांना केलं टॅग



**सामनाच्या फ्रंट पेजवर राज ठाकरे-**

सामानाच्या पहिल्याच पानावर आज उद्धव ठाकरेंच्या पत्रकार परिषदेच्या फोटोच्या बाजूला राज ठाकरे यांच्या पत्रकार परिषदेचा फोटो छापून ''राज ठाकरे यांनी दादाचा भुसा केला'' अशी बातमी सामनाने आज छापली आहे. सामनाच्या पहिल्याच पानावर ठाकरे बंधूंचा आजूबाजूला फोटो छापून हिंदी सक्ती आणि त्रिभाषा सूत्र विरोधी आंदोलनाची बातमी देण्यात आली आहे. हिंदीसक्ती आणि त्रिभाषा सूत्रविरोधात उद्धव ठाकरेंच्या भूमिकेच्या अगदी बाजूला राज ठाकरेंची भूमिकेची बातमी सामनाने आज छापली आहे.

**■मुंबई I प्रतिनिधी :**

हिंदीसक्ती आणि त्रिभाषा सूत्रविरोधात ठाकरे बंधू मैदानात उतरले आहेत. शाळेतील हिंदीसक्तीविरोधात आणि मराठीसाठी आता राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्रितपणे मोर्चा काढणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांनंतर ठाकरे बंधू अखेर एकत्र येणार आहेत. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी याबाबत एक्सवर पोस्ट करत माहिती दिली आहे.

विशेष म्हणजे संजय राऊतांनी ठाकरे बंधू एकत्र मोर्चा काढण्याबाबत पहिले मराठीत ट्विट केले होते. त्यानंतर लगेच संजय राऊतांनी इंग्रजीत दुसरे ट्विट करत थेट केंद्रीयमंत्री अमित शाह आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टॅग केले आहे. जय महाराष्ट्र म्हणत, महाराष्ट्रातील शाळांमध्ये हिंदीसक्तीच्या विरोधात एकच आणि एकत्रित मोर्चा निघेल. ठाकरे हे ब्रँड आहेत, असं ट्विट करत संजय राऊतांनी अमित शाह आणि देवेंद्र फडणवीसांना टॅग केलं आहे. त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र आल्याची बातमी दिल्लीपर्यंत पोहोचणार आहे.

**मनसेचे नेते संदीप देशपांडे काय म्हणाले?**

मला तर वाटतं, मराठी माणसाची एकत्र ताकद दिसणं गरजेचं आहे. राज ठाकरे यांनी काल आवाहन केलं होतं, त्याला समोरुन प्रतिसाद मिळाला. मराठी भाषेची गळचेपी आणि हिंदी भाषेचीसक्ती लादण्याचा प्रयत्न होतोय, त्याविरोधात मराठी माणसाने एकत्र येऊन आवाज उठवणे गरजेचे आहे. मराठी भाषा हा राजकीय मुद्दा नाही. मराठी भाषेपुढे कोणीही छोटं-मोठं नाही, सगळ्यांनी एकत्र आले पाहिजे. यासाठी राज ठाकरे सकारात्मक आहेत, आम्ही सगळे सकारात्मक आहोत. ५ जुलै रोजी हा मोर्चा एकत्रितपणे निघेल, अशी माहिती मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी दिली.

## एकत्र येण्याचा निर्णय घेताच ठाकरे बंधूंच्या २ जवळच्या नेत्यांची हॉटेलमध्ये भेट




**■वर्धा I प्रतिनिधी :**

राज ठाकरे यांच्या शिवाजी पार्कमधील निवासस्थानापासून काही अंतरावरच असलेल्या जिप्सी या रेस्टॉरंटमध्ये संदीप देशपांडे आणि वरुण सरदेसाई यांची भेट झाली. जिप्सी रेस्टॉरंटच्या बाहेरच्या भागात असलेल्या बाकड्यांवर बसून हे दोन्ही नेते गप्पा मारत होते. साहजिकच प्रसारमाध्यमांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले गेले. यावेळी त्यांच्याशी संवाद साधला असता वरुण सरदेसाई यांनी म्हटले की, राज ठाकरे यांच्या आवाहनानंतर उद्धव ठाकरे यांनी त्यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. एकाच विषयासाठी दोन मोर्चे काढण्यापेक्षा एकत्रित मोर्चा काढावा, असा निर्णय दोन्ही नेत्यांनी घेतला. हा मोर्चा भव्यदिव्य असला पाहिजे. यासाठी विद्यार्थी, पालक, कलाकार आणि सामान्य नागरिकांना कशाप्रकारे आवाहन करायचे, यासाठी आमची आजची भेट आहे. आम्ही प्रत्येकवेळी कॅमेऱ्यासमोर भेटतो असे नाही. आम्ही एरवीही एकमेकांना भेटत असतो. राजकारणापलीकडे जाऊन काहीतरी करण्यासाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले आहेत. 5 जुलैच्या मोर्चाविरोधात काही मराठी द्वेष्टे कोर्टात जाण्याची भाषा करत आहेत. त्यांनी आम्ही मराठी जनतेची ताकद दाखवून देऊ. राज ठाकरे यांनी महाराष्ट्र आणि मराठी माणसाच्या हितासाठी आम्ही आपापसातील मतभेद दूर ठेवण्यासाठी तयार आहोत, असे सांगितले होते. उद्धव ठाकरे यांनीही त्या वक्तव्यानंतर मनसेला लगेच टाळी दिली होती. हे दोन्ही पक्ष एकत्र येण्याबाबत आम्ही सकारात्मक आहोत, असे वरुण सरदेसाई यांनी सांगितले.

राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरुन राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. ५ जुलै रौजी मुंबईतील गिरगाव चौपाटी ते आझाद मैदानापर्यंत काढण्यात येणाऱ्या मोर्चात हे दोन्ही नेते सहभागी होणार आहेत.

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी सकाळी सोशल मीडियावरुन यासंदर्भातील घोषणा केली होती. प्रमुख नेत्यांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता मनसे आणि ठाकरे गट यांच्या केडरमध्येही एकत्र येण्याच्या हालचाली सुरु आहेत. याचाच एक भाग म्हणून मनसेचे नेते संदीप देशपांडे आणि ठाकरे गटाचे नेते वरुण सरदेसाई यांनी शुक्रवारी दादरमध्ये एकमेकांची भेट घेतील.

यानंतर संदीप देशपांडे यांना प्रतिक्रिया विचारले असता म्हटले की, आम्ही 5 जुलैच्या मोर्चाच्या नियोजनाची प्राथमिक चर्चा करण्यासाठी भेटलो आहोत. बाकी राजकीय युतीचा निर्णय त्याचा निर्णय दोन्ही पक्षाचे वरिष्ठ नेते घेतील. मुंबईत मोर्चा काढायला कोणीही बंदी घालू शकत नाही. मराठी माणसं एकत्र आलं तर कोणाला आवडणार नाही, असे संदीप देशपांडे यांनी म्हटले.

संदीप देशपांडे आणि वरुण सरदेसाई यांच्या या भेटीनंतर आता मनसे आणि ठाकरे गटात स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांमध्ये मनोमीलन होण्याच्या प्रक्रियेला आणखी वेग आला आहे.

### नशा करण्यासाठी सिरपचा वापर

## परराज्यातील आरोपींकडून मोठा साठा जप्त

**■कल्याण I प्रतिनिधी :**

सरकारने कोडीन आधारित सिरपवर बंदी आणली आहे. त्यानंतरही नशा करण्यासाठी काही जणांकडून कोडीन सिरपचा वापर केला जातो. कल्याण पोलिसांनी कोडीन सिरपची तस्करी करणाऱ्या परराज्यातील तिघांना अटक केली आहे. या तिघांकडून सिरपचा मोठा साठा जप्त केला आहे. त्याची किंमत २७ हजार रुपये आहे. कल्याण परिमंडळ ३ मध्ये अंमली पदार्थांच्या अवैध विक्रीवर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. विशेष कारवाई पथक आणि बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या संयुक्त मोहीम राबवत नशेसाठी वापरण्यात येणारी कोडीन फॉस्फेट सिरपचा मोठा साठा जप्त केला आहे. हा साठा बाळगणाऱ्या तिघा परराज्यीय आरोपींना अटक करण्यात आली आहे.




बाटल्यांची किंमत २७,००० रुपये

पोलिसांना काही संशयित लोकांकडे कोडीन सिरपचा साठा असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्या लोकांच्या हालचालीवर लक्ष ठेवले. त्यांच्याकडे कोडीन सिरप असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर चौकशी सुरु केली. तौसिफ सुर्वे ,लिंगराज आलगुड व इरफान सय्यद या तिघांना ताब्यात घेतले. आरोपींकडून 'ANREX COUGH SYRUP' चे १०० मि.लिच्या १२० सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. या बाटल्यांची एकूण किंमत सुमारे २७,००० रुपये इतकी आहे. आरोपींवर बाजारपेठ पोलीस ठाण्यात ठउद्धर कायदा कलम ८(क), २२(क) तसेच औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४० अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिन्ही आरोपी गुलबर्गा, कर्नाटक येथील आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात त्यांना हे सिरप कोणी दिले, याबाबत पोलिस तपास करत आहेत.

**संभाजीनगरात परराज्यातील ड्रग्स कनेक्शन**

छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज एमआयडीसीमधील एका फार्मा कंपनीतील भंगाराचे कंत्राट घेतलेल्यास अटक करण्यात आली. मुख्य आरोपी बबन खान याला त्याच्या दोन मुलांसह वाहनचालक आणि इतर एक आरोपी अशा पाच आरोपींना अटक केली. कंपनीतून मेडिकल वेस्ट पावडर खानच्या गोदामात येत होती. तेथून खान परराज्यातील ड्रग्ज तस्करांकडे पुरवठा करत होता, असे तपासातून समोर आले आहे. या कारवाईमुळे पुन्हा एकदा ड्रग्जचे मुंबई, गुजरात कनेक्शन समोर आले आहे. न्यायालयाने मुख्य आरोपी बबन खान नजीर खान, त्याची दोन मुले कलीम खान बबन खान, सलीम खान बबन खान, वाहनचालक शफीफुल रहेमान तफज्जूल हुसेन आणि राज रामतिरथ अजुरे या पाच आरोपींना २९ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. पोलिसांच्या माहितीनुसार, कंपनीतील पावडर गोदामात जमा करून खान मुंबई, गुजरातसह अन्य राज्यात पुरवठा करत होता. त्याने अनेक व्यवहार हे बिटकॉइनमार्फत केल्याचे तपासात समोर आले आहे. दरम्यान, कंपनीतील कोणते अधिकारी, कर्मचारी या गुन्ह्यात सहभागी आहेत का..? याचा पोलिस तपास करणार आहेत.

## पुण्यात शादी डॉट कॉमवरुन भेटले अन् पुण्यातील महिलेला ३ कोटी ६० लाखांना लुटलं



तांत्रिक विश्लेषणद्वारे पिडीताला फसवणाऱ्या व्यक्तीचे डॉ. रोहित ओबेरॉय नसून त्याचे खरे नाव अभिषेक शुक्ला, मूळ राहणार लखनऊ, सध्या राहणार पर्थ, ऑस्ट्रेलिया असे निष्पन्न झाले. तसेच आरोपी हा बाहेरील देशात असल्याची माहिती मिळाल्याने त्याचे नावाचे लुक आउट सर्क्युलर तात्काळ जारी केले असता, दि. २५/०६/२०२५ रोजी सदर आरोपी सिंगापूरवरून मुंबईला आल्याची खबर मिळताच मुंबई एअरपोर्टवर त्यास ताब्यात घेऊन गुन्ह्याच्या अनुषंगाने अटक केली असून सध्या आरोपी पोलीस कस्टडी रिमांडमध्ये आहे. पोलिस तपासात समोर आलं आहे की आरोपीने शादी डॉट कॉमवरुन एकूण ३,१९४ महिलांना मेसेज करून संपर्क साधला होता. त्यामुळे आणखी किती महिलांची फसवणूक झाली आहे, याचा तपास सुरु आहे.

**■पुणे I प्रतिनिधी :**

पुण्यात वाढत्या गुन्हेगारीच्या अनेक घटना उघडकीस येत असताना सायबर गुन्ह्यांमध्येही प्रचंड वाढ झाल्याचं दिसून येत आहे. पुण्यातील खराडी भागात राहणाऱ्या एका महिलेला शादी डॉट कॉम या मॅट्रिमोनिअल साईटवरून ३ कोटी ६० लाख रुपये रकमेला फसवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी एका आंतरराष्ट्रीय महाठगाला पुणे सायबर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीचं खरे नाव अभिषेक शुक्ला असून तो मूळचा लखनऊचा आहे. शादी डॉट कॉम या प्रसिद्ध मॅट्रिमोनिअर साईटवरून हे दोघे भेटले होते. फेक प्रोफाईल तयार करून या व्यक्तीनं महिलेस फसवल्याचं समोर आलं.

**नेमकं प्रकरण काय?**

ऑनलाईन विवाह जुळवणाऱ्या शादी डॉट कॉमच्या माध्यमातून ओळख वाढवून पुण्यात राहणाऱ्या एका महिलेला तब्बल ३ कोटी ६० लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय महाठगाला पुणे सायबर पोलिसांनी अटक केली आहे. दिल्लीतील एक महिला पुण्यातील खराडी परिसरात वास्तव्याला असताना, तिची ऑनलाईन एका प्रोफाइलवरून ओळख 'डॉ. रोहित ओबेरॉय' या नावाने स्वतःला ऑस्ट्रेलियन नागरिक म्हणवणाऱ्या व्यक्तीशी झाली. ओळखीनंतर मैत्री, आणि नंतर लग्नाचं आमिष दाखवत आरोपीने महिलेशी जवळीक वाढवली. महिला आणि आरोपी यांनी काही काळ एकत्र वास्तव्यही केलं.

**५ कोटींची पोटगी अन् फसवणूक**

महिलेला तिच्या पहिल्या पतीकडून ५ कोटी रुपयांची पोटगी मिळालेली होती. ती आपल्या व्यवसायासाठी आर्थिक गुंतवणूक करत होती. ही माहिती मिळताच आरोपीने तिचा विश्वास संपादन करून तिचा व्यवसाय आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचं आमिष दाखवलं. फसवणुकीचा बनाव रचत, आरोपीने इव्हॉन हॅन्दयानी आणि विन्सेंट कुआण या नावांची आडसावली वापरत सिंगापूर व भारतातील बँक खात्यांत वेळोवेळी रक्कम भरायला लावली. महिलेने एकूण ३ कोटी ६० लाख १८ हजार ५४० रुपये वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये भरले. काही महिन्यांनंतर आरोपीने बोलणं बंद केलं आणि नंतर त्याचा साथीदार 'विन्सेंट' याने मेल करून त्याच्या मृत्यूची बनावट माहिती दिली. यानंतर महिलेच्या लक्षात फसवणूक झाल्याचं आलं.

### नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गात २८४ पदे भरतीकरिता

## दि. ०१ जुलै ते दि. ०८ जुलै २०२५ या कालावधीत ऑनलाईन परीक्षा

**■ठाणे I प्रतिनिधी :**

नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गात २८४ पदे भरतीकरिता दि. २२ एप्रिल २०२५ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. ही भरती प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्याकरिता तसेच ऑनलाईन पध्दतीने परीक्षेचे आयोजन करण्याकरिता आय.बी.पी.एस. (इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पसोर्नेल सिलेक्शन) कंपनीस नियुक्त केले आहे, त्यानुसार आय.बी.पी.एस. कडून दि. २२ एप्रिल ते दि. १६ मे २०२५ दरम्यान ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरून घेण्यात आले आहेत. त्यानुसार आय.बी.पी.एस.च्या संकेतस्थळावर यशस्वीरीत्या भरलेले अर्ज व पात्र असलेल्या उमेदवारांची दि. ०१ जुलै २०२५ ते दि. ०८ जुलै २०२५ या कालावधीत ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारास त्यांनी नोंदणी केलेल्या ई-मेलवर आय.बी.पी.एस. कडून पाठविण्यात येणार आहे. या परीक्षेकरिता विभागाकडून कोणतीही इतर एजन्सीची वा मध्यस्थाची नेमणूक करण्यात आलेली नाही. जर याबाबत कोणती व्यक्ती, संस्थेकडून, मध्यस्थ अथवा तशी बतावणी करण्यात येत असल्यास अशा व्यक्ती वा संस्थेपासून उमेदवारांनी कृपया सावध राहावे, असे आवाहन नोंदणी व मुद्रांक विभागातर्फे करण्यात आले आहे.




संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# अजितदादा तुम्ही जिंकलात!

अजितदादा तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हाल तेव्हा व्हाल, पण सरकारमध्ये असताना तुम्ही हिंदी भाषेच्या मुद्द्यावरून जी भूमिका घेतली आहे, त्यामुळे तुम्ही महाराष्ट्रप्रेमी मराठी जनतेच्या मनातले मुख्यमंत्री झाला आहात. सत्ता आणि पद येत जात असते, पण राज्याच्या हिताची भूमिका घ्यायची वेळ येते तेव्हा आपण कुठली भूमिका घेतो हे जनता लक्षात ठेवते आणि त्याची इतिहास नोंद घेत असतो. तुम्ही ज्या महायुतीच्या सरकारमध्ये आहात, ते सरकार विविध शब्दांचे खेळ करून महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा घुसवू पाहत आहे, अशा वेळी तुम्ही फक्त मराठी भाषेच्या हिताचा विचार करून पहिली ते चौथीपर्यंत हिंदी भाषा शाळेत शिकवण्याची गरज नाही, पाचवीपासून हिंदी शिकवली जात आहे, ते योग्य आहे, अशी भूमिका मांडलीत. सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असताना तुम्ही हे धाडस दाखवलेत त्याला तोड नाही. जे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मराठी माणसांच्या बाजूने उभे राहणे यशवंतराव चव्हाण आणि शरद पवार यांना जमले नाही ते तुम्ही करून दाखवले आहे. सत्तेत असताना असे धाडस करणे फार अवघड असते. अशामुळे केंद्रातील नेत्यांची नाराजी पत्करावी लागते, मग कुणाचाही मुलाहिजा न बाळगता आणि स्वतःचे काय नुकसान होईल, याचा विचार न करता तुम्ही मराठी भाषेच्या हिताची भूमिका घेतली. मराठी भाषेच्या हिताची म्हणण्याचे कारण असे की, अगोदर इंग्रजी माध्यमांच्या शाळांमुळे मराठी भाषेची गळचेपी होत आहे. त्यात पुन्हा जर हिंदी पहिलीपासून घुसवली तर मराठी भाषा असून नसल्यासारखी होईल. तिच्याकडे पुन्हा दुर्लक्ष होईल. पहिलीच्या मुलांवर एकाच वेळी तीन भाषा शिकण्याची जबरदस्ती करू नये, असे भाषातज्ज्ञ सांगत आहेत. अलीकडे शहरी भागात राहणारे मराठी लोक किंवा विशेषतः विदर्भातले अनेक लोक बोलताना हिंदी भाषेचा वापर करतात, अशा वेळी महाराष्ट्रात मराठीचे भवितव्य काय, असा प्रश्न उभा राहत आहे. महाराष्ट्रातले अनेक भाषातज्ज्ञ, शिक्षण क्षेत्रातील जाणकार, शिक्षक, पालक, मराठी भाषिक लोक पहिलीपासून हिंदी नको, असे टाहो फोडून सांगत असले तरी महायुतीतील पक्ष विविध युक्त्या आणि शब्दांचे खेळ करून ती भाषा महाराष्ट्रात पहिलीपासून घुसडण्याचा प्रयत्न करत आहेत, अशा वेळी अजितदादा तुम्ही मराठी माणसांसाठी भूमिका घेतली आहे, त्यामुळे कुणी तरी सत्ताधारी आपल्यासोबत आहे, असे मराठी माणसाला वाटू लागले आहे. शरद पवार आज विरोधी बाकांवर असल्यामुळे पहिलीपासून हिंदी नको, अशी भूमिका घेत आहेत, पण ते जर सत्तेत असते तर अशी भूमिका त्यांनी घेतली असती का, याबद्दल शंका वाटते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बहुसंख्येच्या आधारे शिवसेना पक्षावर दावा करून त्या पक्षाचे नाव आणि चिन्ह उद्धव ठाकरे यांच्याकडून हिसकावून घेतले. खरी शिवसेना ही आपल्याकडे आहे आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार घेऊन आम्ही पुढे जात आहोत, असे एकनाथ शिंदे सांगत आहेत. असे असेल तर मग केंद्रातील सरकार त्रिभाषा सूत्राच्या माध्यमातून भविष्यात मराठी भाषेची गळचेपी करणारी हिंदी भाषा घुसडत असेल तर एकनाथ शिंदे शांत कसे काय बसू शकतात. हेच बाळासाहेबांचे विचार आहेत का? दुसऱ्या बाजूला महाराष्ट्र नवनिर्माण सेना हिंदीला विरोध करून पेटून उठली आहे. उद्धव ठाकरे यांची शिवसेना हिंदी सक्तीच्या विरोधात मराठी माणसांच्या बाजूने उभी आहे, पण त्याच वेळी मराठी माणसांच्या न्याय हक्कांसाठी लढणारी खरी शिवसेना आम्ही आहोत, असे छातीठोकपणे सांगणारे एकनाथ शिंदे शांत आहेत, याला काय म्हणावे? हिंदीला भाषा म्हणून कुणाचा विरोध असण्याचे काही कारण नाही, पण ती कशा प्रकारे महाराष्ट्रात लागू केली जात आहे, याला आक्षेप आहे. भारताचे हिंदीकरण करण्याचा भाजपचा हेतू वेळोवेळी दिसून आलेला आहे. भारत हा बहुभाषिक देश आहे, विविधतेत एकता या सूत्रावर भारत चाललेला आहे. एकनाथ शिंदे आणि अजितदादा यांचे पक्ष राज्यातील महायुतीच्या सरकारमध्ये घटक पक्ष आहेत, तरीही अजित पवार यांनी जी भूमिका घेतली आहे, त्यामुळे ते सरस ठरत आहेत. अजितदादा तुम्ही धाडस दाखवलेत, महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी घुसडवण्याच्या सरकारच्या कारस्थानाला तुम्ही सुरुंग लावला आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी आणि मराठी भाषेसाठी आकाशपाताळ एक करणारे आचार्य अत्रे जिवंत असते तर अजितदादा त्यांनी तुमचे तोंड भरून कौतुक केले असते. उद्या भाजपप्रणित केंद्रातील सरकारने महाराष्ट्राच्या हिताच्या विरोधात जाणारा कुठला निर्णय घेतला तर तुम्ही महाराष्ट्र आणि मराठी माणूस यांच्या बाजूने उभे राहाल याची खात्री करून दिली आहे. बरेचदा असे होते की, केंद्रातील नेत्यांच्या दबावाखाली राज्यातील नेते त्यांच्या आदेशाप्रमाणे वागतात, त्यामुळे राज्याचे हित दुर्लक्षित होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांनी तेच केले. आता राज्यातील भाजपचे नेते केंद्रातील नेत्यांच्या आदेशाचे पालन करत आहेत, पण मराठी लोकांना काय वाटते, याचा विचार करताना दिसत नाहीत, अशा वेळी सत्तेत असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतलेली मराठी भाषेच्या हिताची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. अजितदादा तुम्ही महाराष्ट्रातील मराठीजनांची मने जिंकली आहेत, तुम्ही जिंकला आहात.

# भ्रम आणि वास्तव




**तथाकथित 'लव्ह जिहाद' नावाचे भूत आपल्या राजकीय फायद्यासाठी आणि विषमतेचे तत्त्वज्ञान पोसण्यासाठी ताकदीने उभे केले जात आहे. या तथाकथित लव्ह जिहाद या संकल्पनेखाली अनेक राज्यांनी कायदे करून आंतरधर्मीय विवाह कठीण केले आहेत. हे कायदे संविधानातील समता व स्वातंत्र्याच्या हक्कांचे उल्लंघन करतात; मात्र, वास्तवात भारतात धर्मांतराचे प्रमाण दोन टक्क्यांपेक्षा कमी आहे.**

**पंछी, नदियाँ, पवन के झोंके**
**कोई सरहद ना इन्हें रोके**
**सरहदें इंसानों के लिए हैं,**
**सोचो तुमने और मैंने**
**क्या पाया इंसाँ होके?**

प्रेम हे मानवी जीवनातील अतिशय उदात्त आणि शाश्वत मूल्य आहे. माणसाचे आयुष्य सुंदर आणि समृद्ध करणारे; मग ते भिन्नलिंगी व्यक्ती मधील असो किंवा माणसामाणसांमधील. सर्वच भारतीय संत आणि समाजसुधारकांच्या चळवळींचा पाया प्रेम हाच होता. क्रांतिकारकांच्या, स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाचा पाया देशाप्रती, देशाच्या माणसांप्रती प्रेम हाच होता. त्यामुळे माणसाचे कशात भले असेल, तर धर्म, जाती, वंश, प्रदेश या सर्व भेदांच्या पलीकडे जाऊन एकमेकांवर प्रेम करणे यातच आहे. परंतु ज्यांच्या तत्त्वज्ञानाचा पायाच मुळी धर्म, जाती, वर्ण, स्त्री-पुरुष, प्रदेश या उच्च-नीचतेवरच अवलंबून आहे, त्या विचारांची सत्ता मध्यवर्ती आल्यानंतर तसा व्यवहार करणे त्यांना गरजेचे आहे आणि यातूनच सध्या तथाकथित 'लव्ह जिहाद' नावाचे भूत आपल्या राजकीय फायद्यासाठी आणि विषमतेचे तत्त्वज्ञान पोसण्यासाठी ताकदीने उभे केले जात आहे. मुळात आंतरजातीय, आंतरधर्मीय, आंतरप्रांतीय विवाह होतात तरी का?

जातीपातीच्या बंदिस्त गावगाड्यातून तरुण-तरुणी शिक्षणासाठी, नोकरीसाठी शहराकडे आल्या. मोकळे वातावरण, दीर्घ काळाचा सहवास आणि महत्त्वाचे म्हणजे समान शैक्षणिक व आर्थिक परिस्थितीमुळे प्रेमसंबंध जुळू लागले आणि जाचक जाती-धर्माच्या डबक्यातून एक पाऊल पुढे टाकत विवाह करू लागले आहेत. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह झालेल्या जोडप्यांकडे बघितले की, ही गोष्ट सहज लक्षात येते. धर्मांतरे आणि आंतरधर्मीय, आंतरजातीय लग्ने ही भारतात अनादि काळापासून होत आलेली आहेत. फक्त लग्नासाठी धर्मांतर स्त्रीलाच करावे लागते. पुरोगामी सन्माननीय अपवाद आहेत. याची दोन कारणे आहेत. एक पुरुषप्रधान, पितृसत्ताक मानसिकता आणि दोन प्रचलित कायदे. कायद्यानुसार, लग्ने कशी लावली जातात?

**हिंदू विवाह अधिनियम (१९५५) :** हिंदू, बौद्ध, जैन, शीख, लिंगायत यांना या कायद्यानुसार हिंदू मानण्यात आले आहे. या कायद्यांतर्गत विवाह करायचा असेल, तर स्त्री आणि पुरुष दोघेही हिंदू असणे आवश्यक आहे.

**मुस्लिम विवाह अधिनियम (१९५७) :** या कायद्यांतर्गत विवाह करायचा असेल, तर स्त्री आणि पुरुष दोघेही मुस्लिम धर्माचे असणे आवश्यक आहे.

**ख्रिश्चन विवाह अधिनियम (१८७२) :** या कायद्यांतर्गत दोन्हींपैकी एक जरी ख्रिश्चन असेल तरी चालतो. परंतु विवाह कायदेशीर होण्यासाठी चर्चमध्ये आणि चर्चमधील अधिकारी व्यक्तीद्वारे पार पाडणे आवश्यक आहे.

**पारसी विवाह अधिनियम (१९३६) :** स्त्री आणि पुरुष दोघेही पारसी धमार्चे असणे आवश्यक आहे.

**विशेष विवाह अधिनियम (१९५४) :** खऱ्या अर्थाने हा धर्मनिरपेक्ष कायदा आहे. भारतातील सर्व जाती-धर्मांतील स्त्री-पुरुष या कायद्यांतर्गत कोणतेही धार्मिक विधी, कर्मकांड न करता विवाह करू शकतात. असे लग्न करण्यासाठी रजिस्ट्रारला निवेदन दिल्यानंतर, रजिस्ट्रारद्वारे नोटीस बोर्डवर संबंधित विवाहाबाबत हरकती मागवल्या जातात. याचा कालावधी असतो एक महिन्याचा. त्यानंतरच विवाह लावले जातात. जाती आणि धर्मांतर्गत विवाह करायचा असेल, तर मुद्दा संपतो आणि बहुसंख्य म्हणजे ९९ टक्के विवाह असेच होतात. पण भिन्नधर्मीय स्त्री-पुरुषांना विवाह करायचा असेल, तर सगळ्यात योग्य मार्ग आहे, तो म्हणजे विशेष विवाह अधिनियमांतर्गत विवाह करणे. परंतु यात अडचण ही आहे की, यामध्ये एक महिन्याचा नोटीस कालावधी आहे. दोन्ही कुटुंबांची, समाजाची मान्यता नसताना पळून जाऊन एक महिना बाहेर राहणे आणि पुन्हा जिल्ह्याच्या ठिकाणी येऊन विवाह करणे, हे खूपच धोकादायक असते. त्यामुळे विवाहेच्छुकांसमोर एकच मार्ग उरतो. तो म्हणजे पुरुष ज्या धर्माचा असेल, त्या धर्माच्या कायद्यानुसार तातडीने लग्न लावणे; म्हणजे स्त्रीने पुरुषाचा धर्म पहिल्यांदा स्वीकारणे. अर्थात पहिल्यांदा धर्मांतर करणे आणि त्या-त्या धार्मिक कायद्यानुसार पुरोहित, मौलाना, पाद्री यांच्याकडून लग्न लावून घेणे, तरच असे विवाह कायदेशीर होऊ शकतात. म्हणजे फक्त विवाहासाठी धर्मांतर नको असेल, तर विशेष विवाह कायद्यातील एक महिन्याचा नोटीस कालावधी रद्द केला पाहिजे आणि दोन सज्ञान भारतीय स्त्री-पुरुषांना आपापल्या संस्कृतीसह सहजीवन जगण्याचा मूलभूत अधिकार दिला पाहिजे.

फक्त विवाहासाठी होणारे किंवा एकूणच भारतातील धर्मांतराचे प्रमाण हे दोन टक्क्यांपेक्षा जास्त नाही. भारतातील सर्वांत मोठे व आधुनिक धर्मांतर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ला हिंदू धमार्तून बौद्ध धम्म स्वीकारून झालेले आहे. तसेच महाराष्ट्रात १२ जानेवारी २००५ रोजीची नवीन शिवधर्माची स्थापना घटनाही अभूतपूर्व आहे. शोषित, पीडित भारतीयांनी ब्राह्मणी धमार्ला दिलेला नकार म्हणजे भारतीय मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मांतरे. आणि या नकारातूनच जैन, बौद्ध आणि शीख धर्माचा उदय होऊन त्यात धर्मांतरे झाली आहेत. तरीदेखील आजच्या काळात भारतातील धर्मांतराचे प्रमाण हे दोन टक्क्यांपेक्षा जास्त नाही.

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक भारतीय नागरिकास सहा मूलभूत अधिकार दिलेले आहेत. त्यातील धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार हा एक महत्त्वाचा आहे. कलम २५ ते २८ नुसार याचा साधा अर्थ असा की, भारताच्या प्रत्येक नागरिकाला त्याच्या आवडीचा धर्म निवडण्याची मुभा आहे. तसेच त्या धर्माप्रमाणे आचार, प्रचार, उपासना करण्याचा अधिकार आहे. सर्व धर्म समान असून, भारत देशाचा एक विशिष्ट असा धर्म असणार नाही. त्यामुळे भारतीय नागरिकांनी त्यांच्या मूलभूत अधिकाराचा वापर केला, तर त्यात काहीही गैर नाही, तरीदेखील वस्तुस्थिती अशी आहे की,, धर्मांतरे होत आहेत आणि ती दोन टक्क्यांपेक्षा जास्त होत नाहीत; म्हणजे भारतीयांची स्वतःच्या धर्मावरची श्रद्धा, विश्वास इतका चिवट आहे की, हजारो वर्षांपासून आजपर्यंत जितकी धर्मांतरे झालेली आहेत; ती अगदी नगण्यच आहेत. ख्रिश्चन मिशनरीज आमिष, लालूच किंवा भीती दाखवून धर्मांतर करीत आहेत, असा आरोप कायमच होत आला आहे आणि त्यासाठी अनेक राज्यांनी धर्मांतरविरोधी कायदे देखील केलेले आहेत. ओरिसा (१९६७) हे धर्मांतरविरोधी कायदा करणारे पहिले राज्य आहे. त्यानंतर मध्य प्रदेश (१९६८), अरुणाचल प्रदेश(१९७८), छत्तीसगड (२०००), गुजरात (२००३), राजस्थान (२००६), हिमाचल प्रदेश(२००६) या राज्यांनी सक्तीच्या धर्मांतराविरोधात कायदे केलेले आहेत. वरील राज्यांच्या धर्मांतरविरोधी कायद्यामध्ये लग्नासाठी केलेल्या धर्मांतरांचा उल्लेख नाही; फक्त अज्ञानाचा गैरफायदा घेऊन आमिष, लालूच, भीती आदी दाखवून केलेल्या धर्मांतराबाबतचे हे कायदे आहेत.

# दोन मेळावे

दोन्ही शिवसेनेचे वर्धापनदिन मेळावे पार पडले. यात चिखलफेक अपेक्षित होती, ती झालीच. दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांना, नेत्यांना व जनाधाराला सुप्त संदेशही दिला गेला. उद्धव ठाकरे यांच्या मेळाव्यात कार्यकर्त्यांचा जोश जाणवला. इतक्या मोठ्या फुटीनंतरही उद्धव यांच्या कार्यकर्त्यांमध्ये असलेला उत्साह हा तसा अचंबित करणारा होता. त्यात उद्धव यांनीही त्यांची स्वतःची नेमस्त शैली सोडून वडील बाळासाहेब ठाकरेंप्रमाणेच राजकीय विरोधकांवर टीका केली. हिंदी सिनेमातील वाक्ये फेकून समोरून मिळणाऱ्या हमखास टाळ्या त्यांनी मिळवल्या. तसेच राज ठाकरे यांचा नाव न घेता त्यांच्यासोबत युती होऊही शकते, असे संकेत दिल्याने कार्यकर्त्यांचा उत्साह अधिकच दुणावला. दुसरीकडे एकनाथ शिंदे हे उद्धव यांच्यापेक्षा जमिनीवरील राजकारणात खूपच माहिर असल्याचे त्यांनी सिद्ध केलेच असले, तरी संघटना, कार्यकर्त्यांना द्यावे लागणारे विचार, याबाबतीत अद्यापही अनुभव घेण्याच्याच प्रक्रियेत असल्याचे दिसून आले. शिंदे भाषण करतानाही सातत्याने कागदावर लिहिलेल्या मुद्द्यांची उजळणी करताना दिसत होते. तसेच उद्धव यांच्या भाषणानंतरच भाषण करण्याचा त्यांचा अट्टाहास व उद्धव यांच्या भाषणातील मुद्द्यांवर तत्काळ प्रतिक्रिया देण्याची त्यांची घाई, कशाकरिता असते, याचे उत्तर मिळत नाही. एकनाथ शिंदे यांनी, त्यांनी केलेल्या कामांचा पाढा वाचताना सरकारने केलेल्या कामांचीच यादी मांडली. शिवसेना पक्ष हा नाव व चिन्हासह मिळाल्यानंतर संघटना म्हणून पक्षाने केलेले काम वा करायची कामे, कार्यकर्त्यांनी नक्की कशावर जोर द्यावा आदी मुद्द्यांचा त्यांच्या भाषणात अभाव दिसला. मात्र असे असले तरी जवळपास सगळीच शिवसेनेची मोठी नेतेमंडळी ही शिंदे यांच्या वर्धापनदिनाला हजेरी लावून होती. त्यामुळे उद्धव यांचा संघटनेवरील ताबा किती कमकुवत होता, हे तर सिद्ध झालेच; तसेच एकनाथ शिंदे यांच्यावर कितीही धनशक्तीच्या प्रयोगाचे आरोप झाले, तरी शाखेतील कार्यकर्त्यांपासून ते शिवसेना नेत्यांपर्यंतची मांदियाळी त्यांनी स्वतःकडे खेचून आणली, हे त्यांचे कसबही मान्य करावे लागते.

# एसटीच्या श्वेतपत्रिकेची बतावणी

**मागील ४५ वर्षांतील फक्त आठ वर्षे वगळता एसटी महामंडळ नेहमीच तोट्यात राहिले आहे. यावर उपाय म्हणून काढलेली श्वेतपत्रिका निराशाजनक ठरली. तोट्याची खोटी कारणे देत प्रशासनाने जबाबदारी टाळली असून, बसेसची कमतरता आणि अव्यवस्था यामुळे नुकसान वाढले आहे. कर्मचाऱ्यांचे वेतनही अडकले आहे. उत्पन्न वाढवण्यासाठी विविध योजना आखल्या जात आहेत; मात्र, सुधारणा आणि कठोर अंमलबजावणीशिवाय एसटीचे भवितव्य अंधारात आहे.**

मागील ४५ वर्षांतील केवळ आठ वर्षांमध्येच एसटी महामंडळाला नफा झाला असून, उर्वरित वर्षांमध्ये महामंडळ तोट्यात आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी ठोस धोरण आणि खर्चात काटकसर करण्याबाबत श्वेतपत्रिका काढण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. त्यानुसार महामंडळाच्या आर्थिक कारभाराची श्वेतपत्रिका काढण्यात आली. यामधून अनेक गंभीर बाबी समोर येतील, अशी अपेक्षा होती. परंतु या श्वेतपत्रिकेने अनेकांची निराशा केली.

महामंडळाकडून यापूर्वी करण्यात आलेल्या बहुतांश घोषणांचा समावेश श्वेतपत्रिकेत करण्यात आला आहे. तर एसटी महामंडळ तोट्यात असण्याची क्षुल्लक कारणे यामध्ये देण्यात आली आहेत. महामंडळाकडील बसेसची कमतरता, उपलब्ध असलेल्या बसेसचे आयुर्मान अधिक असणे, अनिवार्य व तोट्यातील चालन, अनियमित भाडेवाढ आणि अवैध वाहतूक ही एसटी तोट्यात असण्याची महत्त्वाची कारणे असल्याचे श्वेतपत्रिकेत म्हटले आहे. सरकारकडून बस खरेदीसाठी मदत झाल्याचे प्रशासन म्हणत असले, तरी बस खरेदी का झाली नाही, याला जबाबदार कोण, हा प्रश्न निर्माण होतो.

बस खरेदीच्या करारानुसार बस पुरवठादार कंपनीने वेळेत बस पुरविल्या नसल्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई प्रशासनाने प्रस्तावित केली; मात्र, कंत्राटदाराला मोकळे सोडून परिवहन खात्याने कंत्राटदारावर मर्जी दाखवली. त्यामुळे ना बस वेळेत मिळत आहेत, ना कंत्राटदारावर कारवाई झाली. अशी पाठराखण करणारी भूमिका परिवहन खात्याची असताना प्रशासन मात्र बसेसच्या कमतरतेमुळे बस तोट्यात असल्याचे सांगत आहे. केवळ कारणमीमांसा आणि दुसऱ्याकडे बोट दाखवून एसटी नफ्यात येणार नाही; त्यासाठी परिवहन खात्याला कठोर निर्णय घ्यावे लागतील.

राज्यात अवैध वाहतूक कित्येक दशकांपासून सुरू आहे. ती आज सुरू झालेली नाही. खासगी वाहनांचा दर्जा, आरामदायी प्रवास, तिकीट दर यामुळे लांब पल्ल्याचा प्रवास करणारे प्रवासी ट्रॅव्हल्सना मोठ्या संख्येने पसंती देतात. या वाहनांच्या तुलनेत मोडकळीस आलेल्या एसटी बस, अस्वच्छ सीट अशा अनेक कारणांनी प्रवाशांनी एसटीला नाकारले आहे. यावर महामंडळाने गांभीर्याने कधीच विचार केला नाही. खासगी वाहतुकीला पर्याय म्हणून महामंडळाने खासगी शिवनेरी बस आणून टक्कर देण्याचा प्रयत्न केला. मात्र, या बसेसचे वारंवार होणारे अपघात, स्लीपर गाडीऐवजी सिटिंग बस पुरवठा यामुळे प्रवाशांनी शिवनेरी बस सेवेकडेही पाठ फिरवली. महामंडळाच्या उत्पन्न वाढीच्या नावाखाली आपले हितसंबंध बहुतेक परिवहन मंत्र्यांनी जपले. यामुळे महामंडळाचे उत्पन्न वाढणे दूरच; उलट यामध्ये एसटी बदनाम झाली. 'गाव तिथे एसटी' हे ब्रीद घेऊन ग्रामीण भागातील जनतेला सेवा दिलेली एसटी आर्थिक संकटात सापडली आहे. तिला वाचविण्यासाठी सरकारने ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे. मात्र, सद्यस्थितीत सरकार सवलतीची रक्कमही वेळेत देत नसल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यातही महामंडळाला अडचणी येत आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांना दर महिन्याला वेतनासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

एसटी महामंडळ तोट्यात असताना महामंडळाची देणीही कोट्यवधींच्या घरात पोहोचली आहेत. वैधानिक देण्यात कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी १,२६२ कोटी, उपदान विश्वस्त मंडळ १,११४ कोटी, कर्मचारी ठेव विमा योजना २० कोटी, एसटी बँक देणी ७८ कोटी, प्रवासी कर ८२१ कोटी, अशी एकूण ३,२९७ कोटी रुपये देणी आहेत. तर पुरवठादारांच्या रकमेपैकी डिझेल ९६ कोटी, भांडार देयके ९१ कोटी, पुरवठादारांची देयके २९ कोटी, अशी एकूण २१७ कोटी रुपयांची देणी थकीत आहेत. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता आणि इतर देणी मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत. ही देणी महामंडळाला तातडीने द्यावी लागणार आहेत.

महामंडळ नफ्यात आणण्यासाठी नवीन ५,००० बसेस खरेदी करण्यात येणार आहेत. तसेच महामंडळाच्या जागांचा पीपीपी तत्वावर विकास करण्याचे प्रस्तावित आहे. याशिवाय भाडेतत्त्वावर व्होल्वो बसेस घेण्यात येणार आहेत. अशा विविध माध्यमांतून उत्पन्न वाढीचा विचार महामंडळ करत आहे. मात्र, या माध्यमांतून खरेच महामंडळाला नफा होईल की इतर कोणाचे उत्पन्न वाढेल, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.

भाडेतत्त्वावर व्होल्वोच्या ३० शयनयान व ७० आसनी अशा १०० व्होल्वो बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होतील. या कंपनीला एसटीचा लोगो, उत्पन्न देणारे मार्ग, तिकीट सेवा, एसटीची आगारे, थांबे प्रदान करण्यात येतील. त्या बदल्यात खासगी कंपनीच्या एकूण उत्पन्नापैकी एसटी महामंडळाला १० ते १२ टक्के देण्याची योजना आखली आहे. त्यामुळे तोट्यातील एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल, अशी आशा आहे.

एसटी महामंडळाची स्थापना १ जून १९४८ रोजी झाली होती. सुरुवातीच्या दशकांत स्थिर वाढ पाहायला मिळाली. महामंडळाकडे १९८१-८२ साली बसची सरासरी संख्या १०,०२८ होती. तर २०११-१२ मध्ये ही संख्या १८,२७५ झाली. मात्र, २०२४-२५ पर्यंत यामध्ये घट होऊन ही संख्या १५,७६४ वर आली आहे. त्यामुळे एसटीच्या ताफ्यात आणखी बस आणून उत्पन्न वाढविण्याची मंडळाची योजना आहे.

यासोबतच १९८१-८२ मध्ये महामंडळाकडे ७९,४५८ कर्मचारी होते. महामंडळाचा कारभार विस्तारल्यामुळे १९९१-९२ मध्ये कर्मचारी संख्या १,१२,२०० इतकी झाली. मात्र अलीकडे एसटीमध्ये विविध कारणांमुळे कर्मचारी संख्या ८६,३१७ वर आली आहे. सातत्याने कर्मचारी संख्या घटत असल्यामुळेही महामंडळाच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. केवळ श्वेतपत्रिका काढून महामंडळाचे भले होणार नसून, त्यासाठी नियोजनपूर्वक आराखडा तयार करून त्याची तत्काळ अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. एसटी महामंडळाला सुगीचे दिवस यावेत यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. तरच महामंडळाचे भवितव्य उज्ज्वल असेल.



# निवडणुकीत सुधारणेची गरज

नोव्हेंबर २०२४मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवर काँग्रेस नेते राहुल गांधींनी घणाघाती टीका करत भाजपने 'मॅच-फिक्सिंग' केल्याचा आरोप केला आहे. सध्या या विषयावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांना प्रथम उत्तर दिले ते देवेंद्र फडणवीस यांनी. त्यानंतर राहुल यांनी पुन्हा एकदा नागपूर येथील मतदारसंघाबद्दल काही आरोप केल्यानंतर निवडणूक आयोगाने आता त्यांना थेट चर्चेसाठी निमंत्रण दिले आहे. पुढे काय घडते हे पाहणे महत्त्वाचे आहे. निवडणूक आयोगाच्या कारभारावर सातत्याने प्रश्न उपस्थित होणे, हे देशातील लोकशाहीच्या दृष्टीने फारसे हितावह नाही. पण राज्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी हे होत आहे, हे एका दृष्टीने बरेच म्हणायला हवे.

या आरोपांनंतर हरियाणा आणि महाराष्ट्रातील मतदार यादीची माहिती जाहीर करण्याचा घेतलेला निर्णय हे निवडणूक आयोगाने उचललेले एक चांगले आणि स्वागतार्ह पाऊल आहे. निवडणूक आयोगावर असा आरोप होण्याचे कारण लोकसभा आणि लागोपाठ झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात लागलेले धक्कादायक निकाल! विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ५८.१ लाख मते घेऊन ४१ जागा जिंकल्या. तर शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस ७२.८ लाख मते मिळवत १० जागाच जिंकू शकली. लोकसभेला अजित पवार गटाला २०.५ लाख मते, तर शरद पवार गटाला ५८.५ लाख मते मिळाली होती. महायुतीला लोकसभेला एकूण २ कोटी ४३ लाख मते मिळाली होती. तर विधानसभेला या मतांत प्रचंड वाढ होऊन ती ३ कोटी १० लाखांवर गेली.

महाविकास आघाडीच्या लोकसभेच्या आणि विधानसभेच्या मतांच्या आकड्यांत जवळपास २३ लाखांचा फरक आहे. 'मविआ'ला लोकसभेला २.५० कोटी मते मिळाली होती. तर विधानसभेला ती घटून २ कोटी १७ लाखांवर आली. हे निकाल धक्कादायक वाटल्याने निकालांच्या पार्श्वभूमीवर मॅच फिक्सिंगचा आरोप केला गेला होता. सध्या भारत 'फर्स्ट-पास्ट-द-पोस्ट मतदान' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रिटिश डिझाइन प्रणालीचा वापर करत आहे. ही ब्रिटिश संसदीय पद्धतीवर आधारित आहे. हरलेल्या उमेदवाराच्या पक्षांना मिळणाऱ्या मतांचा तसा लोकप्रतिनिधी निवडण्यात फायदा होत नाही, पण याच ठिकाणी जर्मनी आणि इतर काही देशांत अस्तित्वात असलेल्या दुहेरी किंवा पक्ष मतदान पद्धतीचा विचार केला पाहिजे.

भारतात राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळविण्यासाठी देशातील २८पैकी किमान चार राज्यांमध्ये राज्यपातळीवरील पक्ष म्हणून मान्यता मिळणे आवश्यक आहे. पश्चिम महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांपुरता मर्यादित असलेला राष्ट्रवादी काँग्रेस असो किंवा बंगालमधील तृणमूल काँग्रेस असो किंवा दिल्ली, पंजाबपुरता असलेला आप असो किंवा उत्तर प्रदेशातील बसप असो, हे सर्व पक्ष आपला बालेकिल्ला सोडून इतर राज्यांत निवडणुका लढवतात ते केवळ राष्ट्रीय पातळीवर आपल्या पक्षाला राष्ट्रीय मान्यता मिळावी म्हणून. अशा पक्षांना इतर राज्यांत मिळणाऱ्या मतांचा फायदा केवळ राष्ट्रीय पक्ष म्हणून मिळणाऱ्या सुविधांच्या पलीकडे काहीच नसतो. एक प्रकारे ही मते वाया जातात, मात्र या मतविभागणीचा फटका राज्यांतील प्रमुख पक्षांना बसतो.

दिल्ली (भाजपच्या आधी) आणि पंजाबचे मुख्यमंत्रिपद मिळालेल्या आम आदमी पक्षाने आपले उमेदवार भाजपने जिंकलेल्या राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड या तिन्ही राज्यांत उभे केले होते. जोडीला समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्ष, राष्ट्रीय लोकदल या पक्षांचे उमेदवार असतातच. 'आप'चा एकही उमेदवार निवडून आलेला नाही. उर्वरित तीन पक्षांना सुद्धा फारसे यश मिळालेले नाही, पण या सर्व पक्षांना मिळणारी मते ही भाजपविरोधी असतात. आणि अशा प्रकारे भाजपविरोधी पक्षांची मते विभाजित करून हे पक्ष भाजपलाच मदत करतात. यांच्यावर भाजपची 'बी टीम' असल्याचा आरोप केला जातो. कारण त्यांचे मुख्य काम असते भाजपविरोधी मतांचे ध्रुवीकरण होऊ न देणे!

एके काळी काँग्रेसने सुद्धा याच मतविभाजनाच्या भरवशावर देशावर राज्य केले. आज तीच पद्धत भाजप वापरत आहे. उदाहरणार्थ, राष्ट्रवादी काँग्रेसमुळे गुजरातमध्ये काँग्रेस पाच जागांवर २०१७मध्ये पराभूत झाली होती, तर २०२२ ला 'आप'मुळे काँग्रेसला मानहानीकारक पराभव पत्करावा लागला. आप केवळ पाच जागा मिळवू शकला, पण एकूण मतांच्या १४ टक्के मते घेऊन गेला. आज उत्तर भारतातील भाजपनंतरचा सर्वांत मोठा पक्ष म्हणून 'आप' असल्याचा दावा अरविंद केजरीवाल करत आहेत. कारण त्यांच्याकडे काही काळ दोन राज्यांचे मुख्यमंत्रिपद होते, तर सध्या एका राज्याचे!

लोकशाहीत कोणी कुठल्या जागेवर लढावे, यावर कोणतेही बंधन नसते; पण बहुपक्षीय लोकशाहीत त्याचा तोटा होतो. विविध राजकीय पक्षांना मिळणाऱ्या मतांमुळे मतविभाजन होऊन निवडून येणारा लोकप्रतिनिधी अल्प मतांच्या भरवशावर निवडून येतो आणि एक प्रकारे लोकशाहीची खिल्ली उडवली जाते. गोवा, उत्तर प्रदेश, पंजाबमध्ये प्रत्येक मतदारसंघात किमान पाच पक्षांचे उमेदवार प्रत्येक मैदानात होते. गोव्यात तृणमूल काँग्रेस आणि 'आप'च्या उमेदवारांनी काही हजार मते खाल्ली असतील, पण त्याचा परिणाम भाजपच्या विजयात झाला. आता जर्मनीतील व्यवस्था पाहू या. जर्मनीत मतदार दोन मते देतात. एक मत उमेदवाराला तर दुसरे मत पक्षाला. प्रत्येक पक्षाची पक्षातर्फे संसदेत जाणाऱ्या लोकप्रतिनिधींची एक यादी असते. पक्षाच्या यादीतील उमेदवार निवडून आले तर त्यांच्या जागी पक्षातर्फे नवीन व्यक्तींना संधी मिळते.

जर्मनी आणि इतर देशांत विविध पक्षांना मिळणाऱ्या एकूण टक्केवारीनुसार संसदेत प्रतिनिधित्व दिले जाते. म्हणजेच हा नियम भारतात लागू करायचा झाल्यास भाजप, काँग्रेस आणि इतर पक्षांना मिळालेल्या मतांच्या तुलनेत त्या पक्षांना संसदेत जागा मिळतील. जर्मन निवडणूक पद्धतीमध्ये कमीत कमी पाच टक्के मतांचा नियम आहे, जो पूर्ण करणाऱ्या पक्षांना बुंडेस्टॅग संसदेत प्रवेश करण्यास परवानगी देतो. सध्या ही वेळ आली आहे की भारताने जर्मन-आधारित 'बुंडेस्टॅग मतदान पॅटर्न किंवा प्रणाली'चा (ज्याला 'मिश्र-सदस्य प्रमाणिक प्रतिनिधित्व' म्हणूनही ओळखले जाते) विचार केला पाहिजे. मतदान करताना विविध पक्षांना प्राधान्यक्रम देऊन मतदान केलं जाऊ शकतं. यामुळे शेवटपर्यंत मते मोजली जाऊ शकतात. या पद्धतीमुळे लोकशाही अधिकाधिक पारदर्शक होण्यास मदत होईल.

# काकडीचा डोसा



▮ **साहित्य :** १ कप गव्हाचे पीठ, १/४ कप तांदळाचे पीठ, १/४ कप बारीक कापलेली काकडी. चवीनुसार हिरव्या मिरच्या, मीठ, थोडे तेल.

▮ **कृती :** मिक्सरमध्ये काकडी, मीठ आणि मिरची घालून चांगली पेस्ट तयार करून घ्या. त्यामध्ये गव्हाचे पीठ, तांदळाचे पीठ, रवा आणि गरजेपुरते पाणी घालून चांगले हलून घ्या. या पीठाचे नेहमीच्या डोश्यासारखे डोसे तयार करा. हे गरमागरम डोसे कोणत्याही चटणी, सॉस किंवा बटाट्याच्या भाजीसोबत खाता येतील.

**पावसाळा सुरू झाला की, त्वचेच्या समस्या डोके वर काढतात. त्वचेवर रॅश येणे, संसर्ग होणे, लालसरपणा, खाज अशा समस्या निर्माण होतात आणि यापासून बचाव करण्यासाठी नेमके काय करावे हे आपल्याला कळत नाही. मात्र काही घरगुती उपायांनी या समस्येवर उपाययोजना करता येणे शक्य आहे, ज्यामुळे तुमची त्वचा नैसर्गिक आणि चांगली राहील. काय आहेत हे उपाय जाणून घेऊया...**



# पावसाळ्यात त्वचेला जपण्यासाठी ‘हे’ आहेत खास उपाय



▮ **तुळस :** पावसाच्या दिवसांत अनेकांना ॲलर्जी किंवा खाज येण्याची समस्या उद्‌भवते. तुळस ही अँटी- ऑक्सिडंट्स आणि अँटी बॅक्टेरियल असते. हवेच्या कोणत्याही बदलाशी सामना करताना तुळस उपयुक्त ठरते. आपल्याला ज्याठिकाणी त्रास झाला आहे त्याठिकाणी तुळशीचा रस किंवा पेस्ट लावल्यास फायदेशीर ठरते. या रसाने चेहरा धुतल्यास चेहऱ्याच्या सगळ्या समस्या दूर होण्यास मदत होते.

▮ **हळद :** आयुर्वेदात हळद हे अनेक गोष्टींवरील उपयुक्त असे औषध समजले जाते. अँटीसेप्टीक म्हणून ओळखली जाणारी हळद त्वचेच्या समस्येवरील उत्तम उपाय आहे. चेहऱ्यावर कोणताही संसर्ग किंवा ॲलर्जी आली असल्यास तो नष्ट करण्यासाठी हळद अतिशय उत्तम काम करते.


▮ **कोरफड :** कोरफडीचे अनेक उपयोग आपल्याला माहीत आहेत. बाजारात मिळणाऱ्या अनेक क्रीममध्येही कोरफडीचा वापर केला जातो. त्वचेला कोणत्याही प्रकारची ॲलर्जी झाली असल्यास कोरफड त्यावर उपयुक्त ठरते. त्वचेची होणारी जळजळ कोरफड लावल्याने कमी होते.

▮ **जिरे :** त्वचेच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी जिरेही अतिशय उपयुक्त असते. दिवसात ३ ते ४ वेळा पाण्याबरोबरच जिरे घेतल्यास त्वचेच्या समस्या दूर होण्यास मदत होते. जिऱ्यात ई-जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात असते, ज्यामुळे त्वचा चांगली राहते. पावसाच्या दिवसात होणारे त्वचेचे त्रास जिऱ्यामुळे कमी होतात.

# सतत खुर्चीवर बसून काम करत असाल, तर हे वाचाच



**ऑफिसमध्ये** सतत एकाच खुर्चीवर, जागेवर बसणं शरीरासाठी नुकसानकारक आहे. अशा प्रकारच्या बसण्यामुळे त्याचा आरोग्यावर नकारात्मक, विपरीत परिणाम होत असतो. सतत टीव्ही पाहणं, कॉम्प्युटर, स्मार्टफोनवर पाहत राहणंदेखील शरीराला नुकसान पोहोचवत असतं. काही महिन्यांपूर्वी केल्या गेलेल्या संशोधनातून याबाबत आश्चर्यचकित करणारी तथ्य समोर आली आहेत.



अमेरिकेतील मेयो येथील एका क्लीनिकमधून याबाबत संशोधन करण्यात आले. या संशोधनातून शारीरिक असक्रियता धूम्रपानाइतकीच घातक असल्याचं सांगण्यात आलं आहे.

संशोधनानुसार, खांदे, पाठ, कंबरदुखीच्या समस्येपासून ते अगदी टाइप-२च्या डायबिटीज, हृदयरोग, कॅन्सर यांसारख्या आजारांपासून स्वतःचं रक्षण करण्यासाठी चालण्या-फिरण्याचा, व्यायाम करणं आवश्यक असल्याचं म्हटलं आहे. दिवसभर बसण्याची किंवा पडून राहण्याची सवय स्मरणशक्तीसाठी घातक असल्याचीही शक्यता संशोधनातून वर्तवण्यात आली आहे.

संशोधनादरम्यान, अधिकतर युवक जवळपास ८ तासांपर्यंत खुर्चीवर बसत असल्याचं, तसंच टीव्ही किंवा मोबाईल पाहण्यासाठी एकाच जागेवर ३ तास बसून असल्याचं समोर आलं.

शारीरिक स्वास्थ्य निरोगी राखण्यासाठी, दररोज जवळपास १० हजार पाऊलं चालणं आवश्यक आहे. आठवड्यातून ६ दिवस कमीत कमी अर्धा तास व्यायाम करणं गरजेचं आहे.

**संशोधनकर्त्यांनी ऑफिसमध्ये एकाच जागी बसण्याबाबत काही उपाय सुचवले आहेत –**

▮ ऑफिसमध्ये पाण्याची बाटली भरून न ठेवता, तहान लागल्यास जागेवरून उठून पाणी प्यावे.

▮ ऑफिसमध्ये शक्य असल्यास आपल्या जागेवरच किंवा दुसऱ्या ठिकाणी स्ट्रेचिंग करावे.

▮ नाश्ता किंवा जेवणासाठी शक्यतो कँटिनमध्ये जावे. जागेवरच खाऊ नये.

▮ शक्य असल्यास लिफ्टच्या ऐवजी पायऱ्यांचा वापर करावा.

## औषधी दुधी भोपळा

**दुधी भोपळा म्हटले म्हणजे अनेक जण नाके मुरडतात. मात्र तो किती गुणकारी आहे, याबद्दल तुम्हाला कदाचित माहीत नसावे. दुधी भोपळा औषधी भाजी असून त्यात लोह, कॅल्शियम, फॉस्फरस व अन्य खनिजे आहेत. तंतुमय, रेषादार तसेच जीवनसत्त्व ‘क’ असलेली ही फळभाजी दुर्लक्षित आहे. मात्र, आता हळूहळू त्याचे महत्त्व नागरिकांना पटत असल्याने ते खाण्याचे प्रमाण वाढले आहे.**



▮ हृदयविकाराच्या रुग्णांना दुधी भोपळ्याचा रस सकाळ-संध्याकाळ एक-एक वाटी दिल्यास रोहिण्यांमधील कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते.

▮ दुधी भोपळ्याचा रस एक वाटी, लिंबाचा रस एक चमचा व एक चमचा मध एकत्र करून प्यायल्यास मूत्रविकार कमी होतात.

▮ रोज सकाळी काही न खाण्याआधी अर्धा वाटी दुधी भोपळ्याचा रस व एक चमचा आल्याचा रस पाण्यात मिसळून घेतल्यास स्थूलपणा कमी होतो.

▮ भोपळ्याच्या एक वाटी रसात एक चमचा मध व चिमूटभर जायफळ पूड मिसळून तयार झालेला लेप त्वचेवर लावल्याचा कांती उजळते.

▮ एक चमचा आवळा चुर्ण भोपळ्याच्या रसात मिसळून रात्री कोमट पाण्यासह घेतल्याने झोप चांगली लागते. तसेच पोट साफ होते.

▮ दुधी भोपळ्याचा एक वाटी रस एक चमचा ओवा, चिमूटभर काळे मीठ घालून गरम करून ते चाखल्याने पोटाचा फुगीरपणा कमी होतो.

▮ दुधी भोपळ्याचा रस आटवून त्यात एक मिरे व पिंगळी वाटून त्यात एक चमचा मध मिसळून त्याचे चाटण लहान मुलांना दिल्यास छातीतील कफ दूर होतो.

# फॅन्सी आणि क्लासी फ्रिलचे ड्रेस!





लहानपणी तुम्ही फ्रिलचे फ्रॉक आणि स्कर्ट घालून ठुमकत ठुमकत चालत होता. तसेच फ्रिलदार फ्रॉक, स्कर्ट आणि शर्ट सध्या चलनामध्ये आले आहेत. फ्रिलचे फ्रॉक तर मुली कॉर्पोरेट सूटसोबत घालणे पसंत करतात. कारण बोअरिंग दिसणारे फॉर्मल सूट फ्रिलच्या फ्रॉकमुळे नवीन लूकमध्ये दिसतात.

फ्रिलच्या ड्रेसचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे हे फेमिनीन लूक देतात आणि तुम्ही याला पार्टी वेअर ते कॅज्युअल वेअरपर्यंत घालू शकता. या प्रकारचे रफल्ड ड्रेस तुम्ही बऱ्याच डिझाईनमध्ये तयार करू शकता. जसे रफल्ड रॅप ड्रेस, सिंगल लेअर रफल्ड ड्रेस, टीर्ड रफल्ड ड्रेस.

रफल्ड ड्रेस स्टायलिश लूक तर देतातच, त्याशिवाय तुमच्या बऱ्याच समस्यांचे निदान देखील करतात. जसे तुमची बस्ट लाइन स्मॉल असेल तर अशा ड्रेसची निवड करा ज्यात फ्रिल वरच्या बाजूस दिली असेल. आणि जर बस्ट लाइन हेवी असेल तर तुमच्यासाठी अशा प्रकारचे ड्रेस योग्य राहतील, ज्यात फ्रिल व्हर्टिकली स्ट्रेट लाइनमध्ये असेल. जर तुम्ही बॉडीच्या खालील भागाला हेवी लूक देण्याचा प्रयत्न करत असाल तर खालच्या बाजूला फ्रिल असलेले फ्रॉक परिधान करणे उपयुक्त ठरेल.

सध्या बॉलीवूडच्या अभिनेत्री देखील फ्रिलने सजलेले फ्रॉक परिधान करतात. मागील काही समारंभात दीपिका पदुकोण, अनुष्का शर्मा, प्रियंका चोप्रा, सोनाक्षी सिन्हा व प्रीती झिंटा फ्रिलच्या ड्रेसमध्ये आल्या होत्या.

फ्रिलच्या ड्रेसमध्ये तुम्हाला ज्वेलरीची चिंता करण्याची गरज नसते. हे फ्रॉक बिन हेवी ज्वेलरीचे पण चांगले लूक देतात.

फ्रिलदार ड्रेसला तुम्ही बऱ्याच डिझाईन व मटेरियलमध्ये तयार करू शकता. हे हलके कपडे जसे जॉर्जेट, शिफॉन, कॉटन आणि सॅटिनमध्ये जास्त चांगले लूक देतात. तर मग आता पुढच्या पार्टीत वेगळे दिसण्यासाठी एखादा फ्रिलचा ड्रेस स्वतःसाठी नक्कीच तयार करा.



# उपयोगी पडणाऱ्या ब्युटी टिप्स

▮ स्टीम बाथ घेण्यापूर्वी शक्य तितके जास्त पाणी प्यावे म्हणजे डिहायड्रेशनचा त्रास होणार नाही.

▮ नाक, तोंडावर कपडा बांधून स्वयंपाकघराची स्वच्छता केल्याने धुळीचे कण शरीरापर्यंत पोहोचत नाहीत.

▮ कैरीच्या कच्च्या पांढऱ्या बिया, मेंदी, कडूलिंबाची पावडर यांचे मिश्रण केसांकरिता उपयोगी असते.

▮ नेल ब्लिच तयार करताना सायट्रिक ॲसिड किंवा हायड्रोजन पेरॉक्साईडचा वापर साधारणपणे केला जातो.

▮ रात्री झोपताना लिंबाचा रस, गुलाब पाणी व ग्लिसरिन लावा. हात-पाय मऊ व चकचकीत होतात.

▮ स्विमिंग करताना स्विमिंग कॅप वापरावी. कारण पूलच्या पाण्यात क्लोरिन जास्त असल्यामुळे केस खराब होतात.

▮ केसांमध्ये हेअर ड्रायरचा वापर कमीत कमी करावा. कारण, केस गळण्यास सुरुवात होते तसेच ते द्विभाजितही होतात.

▮ नॅचरल मेकअपसाठी फाऊंडेशन लावल्यानंतर दोन मिनिटानंतर पावडर लावायला पाहिजे. त्याने फाऊंडेशनमुळे पडणारे चकते दिसणार नाही.

▮ जरदोसी मेंदी सिल्व्हर किंवा गोल्डन शेडमध्ये असते. मेंदीने हातांवर सिल्व्हर किंवा गोल्डन रंगाने डिझाइन बनवण्यात येते.

▮ चौपाटी किंवा एखाद्या डोंगरावर ट्रेकिंगला जाण्याचा प्लान करत असल तर आपल्या त्वचेची काळजी घ्यायला विसरू नका.

▮ गुडघ्यापर्यंत मिडी किंवा मिनी स्कर्टसोबतसुद्धा लॅगिंग्सचा वापर करता येतो. लॉंग स्कर्टसोबत स्लॅक्स वापरू शकता.

**डायबेटिसच्या रुग्णांनी खाण्या-पिण्याबाबत विशेष पथ्य पाळणे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. शुगर कंट्रोलमध्ये ठेवण्यासाठी काही गोष्टी आवश्यक असतात. त्यासाठीच या टिप्स..**

# शुगरवर कंट्रोल ठेवण्यासाठी हे टाळा...

▮ साखरयुक्त पदार्थ, मध, सरबत, सिरप, कोल्ड ड्रिंक्स, गूळ, तूप, केक, पेस्ट्री, आईस्क्रीम, दारू, बीयर आदींचे डायबेटिसच्या रुग्णांनी सेवन करू नये. ▮ ज्या भाज्या जमिनीत येतात, उदा. बटाटे, रताळे, इत्यादी भाज्या खाणे टाळावे. ▮ केळी, चिकू, आंबा, सीताफळ, द्राक्ष, पपई, पेरू, ऊस आदी फळे वर्ज्य करावीत. ▮ काजू, मनुका, बदाम, भुईमुगाच्या शेंगा, अक्रोड आदी सुकामेवा टाळावा. ▮ मांसाहार टाळावा. ▮ भात, वरण, दूध, पनीर, दही, मासे आदी पदार्थ कमी प्रमाणात खावेत. ▮ कच्च्या भाज्या उदा. मेथी, पालक, दुधी भोपळा, मुळा, कोथिंबीर, गोबी, चवळी, टोमॅटो, कांदा, कारले, कांद्याची पात, कैरी, लिंबू पाणी आदी पदार्थ भरपूर प्रमाणात खावे



**दररोज व्यायाम करणं आरोग्यासाठी फायदेशीर आहे. व्यायाम केवळ फिट ठेवत नाही तर अनेक आजारांपासूनही संरक्षण करतो. पण व्यायाम करण्यासाठी अधिक ऊर्जेची गरज भासते. त्यामुळे आहारात योग्य त्या पदार्थांचा समावेश करणं आवश्यक आहे.**

# दररोज व्यायाम करणाऱ्यांनी आहारात ‘या’ पदार्थांचा समावेश करा



**प्रोटीन :** शरीराच्या वजनानुसार, दररोज ०.९ ग्रॅम प्रोटीन आपल्या आहारातून घेणं गरजेचं आहे. जर तुम्ही वजन नियंत्रणात राखू इच्छिता तर कॅलरीचं प्रमाण तपासणं महत्त्वाचं आहे.

**फळे :** जितकं शक्य आहे तितकं आहारात फळांचा समावेश करा. फळांमध्ये पुरेशा प्रमाणात फायबर असतं. व्यायाम करण्याच्या जवळपास दोन तासांपूर्वी आणि त्यानंतरही केळे खाणे शरीरासाठी फायदेशीर आहे. संत्री, द्राक्षही फायदेशीर ठरतात.

**कार्बोहायड्रेट :** कार्बोहायड्रेट प्रोटीनच्या तुलनेत शरीराला लवकर ऊर्जा प्रदान करतात. याची व्यायामावेळी अधिक आवश्यकता असते. कार्बोहायड्रेट मांसपेशींमध्ये ग्लायकोजनची गरज भरून काढण्यासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे आहारात फरसबी, ब्राऊन राइस यासारख्या पदार्थांचं सेवन करणं महत्त्वाचं ठरतं. व्यायाम करण्याआधी ५० ग्रॅम कार्बोहायड्रेट घेण्याचा सल्ला दिला जातो.

**बदाम दूध किंवा ओट्स दूध :** व्यायाम करण्याआधी बदाम दूध किंवा ओट्स दूध पिणं आवश्यक ठरतं. हे शरीराला पुरेशी ऊर्जा पुरवण्याचं काम करतात. यामुळे व्यायाम करतानाही ऊर्जा मिळते. तसंच शरीराला पुरेसं पोषणही मिळण्यास मदत होते.

**स्ट्रॉबेरी फारच आकर्षक दिसते, त्यामुळे पाहताक्षणीच खावीशी वाटते. आंबट-गोड चवीचं हे फळ थंडीच्या दिवसात मिळतं. स्ट्रॉबेरीचा आकार लहान असला तरी आरोग्याच्या दृष्टीने ती फारच गुणकारी आहे. स्ट्रॉबेरी हे मेंदूचं खाद्य असल्याचं एका संशोधनातूनही समोर आले आहे. भरपूर अँटीऑक्सिडंट्स असल्याने स्ट्रॉबेरीच्या सेवनाने मेंदूची क्षमता वाढते. इतर अनेक रोगांवरही हे फळ उपयुक्त ठरतं. चला जाणून घेऊ स्ट्रॉबेरीचं आपल्या आहारातील महत्त्व...**

# बहुपयोगी स्ट्रॉबेरी



▮ दिवसाला तीन ते चार स्ट्रॉबेरी खाल्ल्याने स्मरणशक्ती तसेच एकाग्रता वाढायला मदत होते.

▮ स्ट्रॉबेरी हे पोटॅशियम आणि ‘क’ जीवनसत्त्वाने समृद्ध फळ आहे. हे दोन्ही घटक तुम्हाला उत्साही ठेवण्यास मदत करतात.

▮ वाढत्या वयात त्वचेवर सुरकुत्या पडतात. पण स्ट्रॉबेरीमुळे या सुरकुत्यांचं प्रमाण कमी होतं.

▮ स्ट्रॉबेरी खाल्ल्याने तुमची रोगप्रतिकारक क्षमता वाढते.

▮ हार्मोन्सचं संतुलन तसंच हाडांच्या आरोग्यासाठी स्ट्रॉबेरीचा आहारात समावेश करायला हवा.

▮ शरीरावर आलेली सूज स्ट्रॉबेरीच्या सेवनाने कमी होते.

▮ कॅन्सरपासून बचाव करण्याची क्षमता स्ट्रॉबेरीत आहे.

▮ केस आणि त्वचा या दोन्हीचं आरोग्य राखण्यातही स्ट्रॉबेरी महत्त्वाची भूमिका बजावते. म्हणूनच अनेक सौंदर्यप्रसाधनांमध्ये स्ट्रॉबेरीच्या तत्त्वांचा वापर केला जातो.

▮ स्ट्रॉबेरीतील काही गुणधर्मांमुळे सूर्याच्या अतिनील किरणांपासून केस आणि त्वचा यांचं रक्षण होऊ शकतं.



# मधुमेहींसाठी उपयुक्त पामर किंवा जांभूळ आंबा

**उन्हाळ्याचे** दिवस हे रसदार, रसाळ आंब्याचे दिवस तर पावसाळ्यात जांभळे खाण्याची मजा काही औरच. ही दोन्ही फळे ज्यांना मनापासून आवडतात त्यांना या दोन्ही फळांची चव एकाच फळात मिळाली तर? होय या दोन्ही फळांची चव एकत्र चाखण्याची संधी आता भारतीयांना साधता येणार आहे. अमेरिकेच्या फ्लोरिडा राज्यात विकसित झालेला जांभूळ आंबा, मूळ नाव पामर मँगो, आता उत्तर प्रदेशात काही ठिकाणी लावला गेला आहे. हा आंबा मधुमेहींसाठी खूपच उपयुक्त असल्याच्या बातम्या व्हायरल झाल्या आहेत.

या जातीचे सगळ्यात पहिले रोप १९२५ साली मियामी येथे लावले गेले होते. २००१ पासून या इंटरनेटवर या विशेष आंब्याची चर्चा होते आहे. ब्राझीलमध्ये या जातीच्या आंब्याचे मोठे उत्पादन घेतले जाते. आता भारतात या जातीच्या आंब्याची लागवड केली जात असल्याचे समजते. सोशल मीडियावर त्यासंदर्भात बातम्या येत आहेत.

या आंब्याचा रंग फिकट जांभळा असून जांभूळ आणि आंबा या दोन झाडांच्या संयोगातून ही जात विकसित गेली आहे असे सांगितले जात आहे. या आंब्याची चव आंबा आणि जांभूळ यांचे मिश्रण आहे.

या आंब्यात अँटीऑक्सिडंट आहेत. याच्या सेवनाने पचन सुधारते, रक्त शुद्ध होते त्यामुळे त्वचा रोग दूर होतात, रक्तशर्करेचे प्रमाण कमी होते, वजन नियंत्रणात येते असे सांगितले जाते. या आंब्याच्या जातीचे एक नाव टोमी एटकिन असे असून यातही दोन वेगळ्या जाती आहेत. अर्थात या आंब्याच्या सेवनाचे जे फायदे सांगितले जात आहेत त्याची पुष्टी केली गेलेली नाही.

**जगातील सर्वात प्रसिद्ध इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲप काही दिवसांपासून नवनवीन फीचर घेऊन येत आहे. दरम्यान, थर्ड पार्टी ॲप्सच्या वापरामुळे फॅन्सी फॉण्ट्सच्या मदतीने चॅटिंगची मजा आणखी वाढणार आहे.**

# व्हॉट्सॲपवर चॅटिंगची मजा आणखी वाढणार, फॅन्सी फॉण्ट्स वापरून कसं कराल चॅटिंग?

**व्हॉट्सॲपचा** वापर आजकाल इतका वाढला आहे की जर एखाद्याला एखादी गोष्ट सांगायची असेल किंवा एखादं महत्त्वाचं डॉक्युमेंटही पाठवायचं असेल तर आपण मी व्हॉट्सॲप करतो असंच म्हणत असतो. त्यामुळे आजकाल मेसेज पाठवण्यापासून ते कॉलिंग आणि व्हिडीओ कॉलिंग तसंच महत्त्वाची कागदपत्रं पाठवण्यासारखी सर्वच कामं व्हॉट्सॲपवर होत असतात.

आता व्हॉट्सॲपची हीच चॅटिंग आणखी भारी आणि रंगतदार होणार आहे. तर आज आम्ही तुम्हाला एक अद्‌भुत ट्रिक सांगत आहोत ज्यामुळे चॅटिंगची मजा द्विगुणित होईल. व्हॉट्सॲपचा फॉंट बदलता येणार आहे. पण अजून तरी व्हॉट्सॲपने असे कोणतेही फीचर दिलेले नाही, त्यामुळे या कामात थर्ड पार्टी ॲप्स तुम्हाला मदत करतील. या ॲपचे नाव आहे स्टायलिश टेक्स्ट-फॉण्ट कीबोर्ड. तुम्ही हे ॲप कसे वापरू शकता ते आम्ही तुम्हाला सांगतो...

**व्हॉट्सॲपवर चॅटिंगचा फॉंट कसा बदलाला?**

▮ सर्वप्रथम तुम्हाला प्ले स्टोअरवर जावे लागेल. त्यानंतर Stylish Text – Fonts Keyboard टाइप करा आणि हे ॲप इन्स्टॉल करा.

▮ डाऊनलोड केल्यानंतर, ॲप उघडा आणि स्क्रीनच्या खालील उजव्या कोपऱ्यात दिलेल्या बाणावर टॅप करा.

▮ त्यानंतर Agree बटण दिसल्यावर त्यावर टॅप करा.

▮ नंतर तळाशी उजव्या कोपऱ्यात कीबोर्ड विभागात जा.



**अनोळखी कॉल होतील म्यूट**

व्हॉट्सॲपमध्ये आणखी एक नवीन फीचर्स येणार असून समोर आलेल्या माहितीनुसार व्हॉट्सॲपमध्ये अनोळखी नंबरवरून आलेला फोन व्हॉट्सॲपवर आपोआप सायलेंट होणार आहे. हे फीचर कंपनी घेऊन येणार आहे. व्हॉट्सॲपच्या नव्या फीचर्सबद्दल माहिती देणाऱ्या WABetainfo च्या रिपोर्टनुसार ॲण्ड्रॉईड 2.23.10.7 अपडेटसोबत या फीचरला कंपनी आणणार आहे. याच्या मदतीने अनोळखी नंबरवरून येणारा फोन सायलेंट करू शकतो. अनोळखी नंबरला सायलेंट करण्यासाठीची सेटिंग व्हॉट्सॲपच्या सेटिंगमध्ये प्रायव्हसी ऑप्शनमध्ये असेल. ती सेटिंग ऑन करताच हे फीचर वापरता येईल. फोन सायलेंट झाल्यावर नंतर कळण्यासाठी हा नंबर नोटिफिकेशन आणि कॉल लॉगमध्ये नक्कीच दिसेल.

# मुंबई लोकलचा रेल्वेप्रवास भीतीदायक

## महिला प्रवाशांनी मांडल्या प्रवासादरम्यान होणाऱ्या यातना

■**वसई(बातमी/लेख प्रीती दीपक नाईक)** : चर्चगेट-विरार महिला विशेष लोकलमध्ये दोन महिलांमध्ये झालेल्या हाणामारीची चित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. लोकल प्रवासादरम्यान लोकलमधील गर्दीमुळे होणारे महिलांचे वाद, लोकलमधील महिला गटबाजीमुळे होणारे वाद, जागेवरून होणारे वाद हे विरार ते चर्चगेट आणि चर्चगेट ते विरार लोकल मध्ये नेहमीचे झाले आहेत. मध्य रेल्वे, हार्बर रेल्वे आणि मुंबई उपनगरी रेल्वे प्रवासादरम्यानही हीच स्थिती आहे. यामुळे रामुळे महिला प्रवास भीतीदायक झाला आहे. वर्षानुवर्षे चालत आलेल्या या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी महिला डब्यांची संख्या वाढवणे, अधिकाधिक लोकल फेऱ्या, प्रवासादरम्यानच्या महिलांच्या मक्तेदारीला चाप बसवणे आणि योग्य तो तोडगा काढण्याची मागणी आता महिला रेल्वेप्रवाशांकडून पुढे येत आहे.

**बुलेट ट्रेन राहू द्या, आधी उपनगरीसेवा सुधारा!**

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम एकीकडे जोमाने सुरू आहे, तर दुसरीकडे महिला प्रवाशांसाठी लोकलप्रवास धोकादायक बनला आहे. त्यामुळे हा प्रवास आधी सुधारा मग बुलेट ट्रेनकडे लक्ष द्या, अशी मागणी आता पश्चिम रेल्वेसह मुंबई उपनगरी रेल्वे महिला प्रवाशांकडून होत आहे. दोन दिवसांआधीच चर्चगेट ते विरारदरम्यान दोन महिलांमध्ये हाणामारी झाली. अगदी रक्तबंबाळ होईपर्यंत महिलेला मारहाण झाली




**लेडीज स्पेशल वाढवा**

लोकलमध्ये महिला प्रवाशांची संख्या जास्त आणि त्या तुलनेत डबे कमी असतात. त्यातच महिलाप्रवासी अगदी दरवाजाच्या प्रवेशद्वारावरच ठाण मांडून असतात. त्यामुळे इतर प्रवाशांना प्रवेश करता येत नाही. यासाठी दरवाजावर ठाण मांडणाऱ्या महिला प्रवाशांवर कारवाई करावी. तसेच लेडीज स्पेशल लोकल कमी असल्याने त्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी पश्चिम रेल्वे, मध्य आणि हार्बर रेल्वेवरील महिला प्रवाशांनी केली आहे.

होती. या प्रकारानंतर आता सर्वच महिला प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. लोकलमधील वाढत्या गर्दीमुळे महिलांना जीवमुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अगदी लोकलमध्ये प्रवेश करण्यापासून ते नियोजित स्थानकात उतरेपर्यंत एकप्रकारे महिलांना युद्धच लढावे लागत असल्याचे महिलांचे म्हणणे आहे. याबाबत काही महिलांनी प्रवासादरम्यानच्या यातना आणि समस्या मांडल्या. तसेच त्यावर तोडगा कसा काढता येईल, यावर त्या व्यक्त झाल्या आहेत.

**वाढणारी गर्दी आणि अपुरे लोकल डबे**

विरार ते चर्चगेट लोकलमध्ये सकाळी, तर चर्चगेट ते विरार लोकलमध्ये सायंकाळच्या वेळी मोठी गर्दी असते. १२ डब्यांच्या लोकलमध्ये महिलांचे तीनच डबे असतात. त्यातच फर्स्ट क्लास डबादेखील असतो. त्यामुळे सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी या लोकलमध्ये प्रवेश करणे हा रोजच युद्धाचा प्रसंग असतो. वाढत्या गर्दीकडे पाहता रेल्वे प्रशासनाने डबे वाढवणे गरजेचे असल्याचे मत वसईतील महिला प्रवासी सांची गुजराथी यांनी व्यक्त केले आहे.

**जागेवरून वाद**

उपनगरी रेल्वे प्रवासादरम्यान महिला डब्यांमध्ये प्रवास करताना एखाद्या जागेवर बसलेल्या महिलेची जागा ती उतरल्यानंतर बसण्यासाठी आधीच अडवली जाते. जागा अडवण्यावरून महिला डब्यांमधील वाद काही नवीन नाहीत. यासाठी प्रशासनाने नियमावली तयार करायला हवी, असे विरारमधील प्रवासी श्रद्धा जाधव म्हणाल्या.

**विविध कारणांमुळे वाद**

पश्चिम रेल्वे आणि मुंबई उपनगरी रेल्वेमध्ये प्रवास करताना महिलांच्या डब्यात मोठी गर्दी असते. अशातच एखाद्या महिलेला धक्का लागल्यास, केस हवेने उडून ते लागत असल्यास, हातातील बॅग लागत असल्यास आणि पायावर पाय पडल्याच्या कारणावरून रोज दोन तरी वाद पाहावयास मिळतात. ते वाद अगदी मारामारी आणि शिवीगाळपर्यंत जातात. त्यामुळे यासाठी आधी महिलांनीच दुसऱ्या महिलेला समजणे गरजेचे आहे, असे मत प्रवासी तथा समाजसेविका अभिलाषा वर्तक यांनी व्यक्त केले.

**महिला पोलिस कर्मचारी हवेत**

हार्बर आणि ट्रान्स हार्बर या जास्त गर्दी नसणाऱ्या रेल्वे मार्गावरही सध्या घाईच्या वेळी मोठ्या प्रमाणात गर्दी होताना दिसते. अशा वेळी महिलांची जागेवरून, गाडीत चढण्यावरून भांडणेही होतात. अनेक वेळा काही मुली आत जागा असतानाही दारातच उभ्या असतात. त्याने वाद होणे किरकोळ झाले आहे. मात्र, यातून मोठा वाद होऊ शकतो. त्यामुळे महिलांच्या डब्ब्यात महिला पोलिस कर्मचाऱ्याची नेमणूक असावी, असे वाटते. जेणेकरून सर्वांना लोकलमधून प्रवास करताना एक धाक राहील, असे मत महिला प्रवासी अश्विनी हरियाण यांनी व्यक्त केले आहे.

**ठाणे-अंधेरी प्रवास कठीण**

ठाण्याहून घाटकोपर आणि नंतर मेट्रोने अंधेरी असा प्रवास करताना दोन वेळा ट्रेन बदलावी लागते. गर्दीमुळे चढणेच कठीण झाले आहे. मर्यादित महिला डब्यांमुळे आणि ट्रेनची कमी वारंवारता यामुळे रोजची कसरत सुरू आहे. गर्दी, अपुरी वाहतूक व्यवस्था आणि वेळेचा ताण यामुळे प्रवास अधिकच कठीण होत चालला असून यावर तोडगा काढण्याची मागणी ठाण्यातील महिला प्रवासी प्रियांका वाघ यांनी केली आहे.

# ठाणे ते बोरिवली १५ मिनिटांत

## दुहेरी बोगद्यासाठी १२ हजार ५७ कोटींचा खर्च, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आढावा

■**मुंबई** : मुंबईपाठोपाठ ठाण्यातील वाहतूककोंडी फोडण्यासाठी ठाणे-बोरिवलीदरम्यान दुहेरी बोगद्याचा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. सध्या ठाणे ते बोरिवलीदरम्यान प्रवासासाठी एक ते सव्वा तास लागतो. मात्र ११.८४ किलोमीटर लांब या दुहेरी बोगद्यामुळे ठाणे ते बोरिवली प्रवास फक्त १५ मिनिटांत शक्य होणार असून वेळ व इंधनाची बचत होणार आहे. या प्रकल्पासाठी १२ हजार ५७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. दुहेरी बोगदा प्रकल्प डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी गुरुवारी विधान भवनातील कॅबिनेट सभागृहात घेतला. यावेळी ते बोलत होते.

दुहेरी बोगदा हा ११. ८४ किलोमीटर लांबीचा असणार आहे. त्यामुळे बोगद्यात हवा खेळती राहिली पाहिजे. त्यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिरिक्त जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने करावी. प्रकल्पाच्या निर्मितीसाठी वनविभागाची दुसऱ्या टप्प्यातील परवानगी, रात्रीला काम करण्याची परवानगी घेण्यात यावी. बोरिवली बाजूकडील काम गतीने पुढे जाण्यासाठी आणि या बाजूकडील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी धडक कार्यक्रम राबवून एक महिन्यात कार्यवाही पूर्ण करावी, असे निर्देश फडणवीस यांनी दिले. यंत्रणांनी समन्वय ठेवून प्रकल्पग्रस्तांना भाडे देऊन अथवा अन्य गृहनिर्माण प्रकल्पात पुनर्वसनासाठी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. सबंधित अधिकाऱ्याने एक महिना कार्यवाही करीत पुनर्वसन पूर्ण करावे, बोरिवली बाजूकडील अदानी, टाटा पॉवर प्रकल्पातील आवश्यक असलेल्या जमिनीचे संपादन करावे, तसेच भूमिगत वीजवाहिन्या टाकण्यासाठी अदानी पॉवर कंपनीला रस्त्याची अंतिम नियोजन द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी सादरीकरण केले.



**असा असणार दुहेरी बोगदा**

ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा ११.८४ किलोमीटर लांबीचा आहे. प्रकल्प दोन पॅकेजमध्ये उभारण्यात येणार आहे. बोरिवली बाजूने ५.७५ किलोमीटर पॅकेज एक आणि ठाणे बाजूने ६.०९ किलोमीटर पॅकेज दोन असणार आहे. पॅकेज एकमध्ये ६ हजार १७८ कोटी आणि पॅकेज दोनमध्ये ५ हजार ८७९ कोटी अशा प्रकारे एकूण १२ हजार ५७ कोटी रुपयांचा खर्च या प्रकल्पाला अपेक्षित आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कार्बन उत्सर्जन १.४ लाख मॅट्रिकने टन प्रतिवर्ष कमी होणार आहे.

# पीओपी मूर्तींचे विसर्जन केले जाणार कृत्रिम तलावात

■**भाईंदर** : महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पीओपी गणेश मूर्ती विसर्जनाबाबत चर्चा सुरु होती. पीओपी मूर्तीमुळे पर्यावरणाचे नुकसान होत आहे. यावर्षी उच्च न्यायालय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पीओपी मूर्तीला परवानगी दिली आहे. परंतु मार्गदर्शक सूचना दिल्या असून त्यानुसार आगामी गणेशोत्सवात पीओपीच्या सर्व गणेशमूर्तीचे विसर्जन केवळ कृत्रिम तलावात करावे असे निर्देश दिले. त्यानुसार मिरा-भाईंदर महापालिकेकडून गणेशमूर्तीचे विसर्जन केवळ कृत्रिम तलावातच केले जाईल, यासाठी नियोजन केले जात आहे. एकही पीओपीची मूर्ती नैसर्गिक तलावात विसर्जित केली जाणार नाही, असे महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी सांगितले आहे. महाराष्ट्रात गेल्या काही दिवसापासून पर्यावरणाचे संतुलन ढासळले असून पर्यावरणाची हानी होत आहे. यासाठी पीओपी गणेश मूर्ती बनवणे बंद करावे व शाडू मातीपासुन मुर्ती बनवाव्यात असे पर्यावरण प्रेमी नागरिकांकडून मागणी केली जात आहे. उच्च न्यायालयात पीओपी गणेशमूतीसंदर्भात याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने पीओपीच्या मूर्तीना परवानगी देताना पीओपी मूर्तीचे विसर्जन हे नैसर्गिक पाण्यात किंवा तलावात न करता ते फक्त कृत्रिम तलावातच करावे असे बंधनकारक केले आहे. मिरा-भाईंदर शहरात गेल्या वर्षी घरगुती व सार्वजनिक २२ हजारा पेक्षा जास्त गणेशमूर्तीची स्थापना करण्यात आली होती. यामध्ये ७० - ८० टक्के गणेशमूर्ती पीओपीच्या असतात. यातील थोड्या प्रमाणात पीओपी मूर्तीचे कृत्रिम तलावात विसर्जन केले जाते. मोठया प्रमाणात नैसर्गिक तलाव व खाड्यांमध्येच पीओपी मूर्ती विसर्जित केल्या जातात.



न्यायालयाच्या आदेशानुसार मिरा-भाईंदर महापालिकेचे आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी महापालिका प्रशासनाला न्यायालयाच्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. मिरा- भाईंदर शहरात १८ नैसर्गिक तलाव आहेत. महापालिकेकडून शहरात केवळ तीन ते चारच कृत्रिम तलाव बांधण्यात येत होते. त्यामुळे मोठ्या संख्येने नैसर्गिक तलावातच विसर्जन केले जात होते. यावर्षी कृत्रिम तलावांची संख्या वाढवून नैसर्गिक तलावाएवढीच करण्यात येणार आहे. तसेच नैसर्गिक तलावाजवळच उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होणार नाही, असे आयुक्तांनी सांगितले. याबाबत मूर्तीकारांना सूचना देण्यात येत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने पीओपी मूर्ती सहज ओळखता यावी, यासाठी पीओपी मूर्तीवर निशाणी करणे बंधनकारक केले आहे. तसेच पीओपी गणेश मूर्ती तयार करणार्या मूतीर्कारांना आणि पीओपी मूर्तीची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना त्यांचे कारखाने आणि विक्री केंद्र याठिकाणी पीओपी मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावातच केले पाहिजे, असे लिहिलेले फलक ठळकपणे दिसतील असे लावणे बंधनकारक आहे. पीओपी मूर्तीची उंची किती असावी यासंदर्भात राज्य सरकारकडून मार्गदर्शक सूचना जाहीर झाल्यानंतर कत्रिम तलावांची लांबी आणि रुंदी निश्चित करण्यात येणार आहे, अशी माहिती आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी दिली.

# भिवंडीत दरड कोसळल्याने सात झोपड्यांचे नुकसान



■**भिवंडी** : भिवंडी शहरात रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे नागाव गायत्री नगर परिसरातील दरड कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत सात झोपड्यांचे नुकसान झाले परंतु सुदैवाने कोणतीही जीवितहानी अथवा जखमी कोणी झाले नाही. नागाव गायत्रीनगर येथील डोंगरावर मोठ्या प्रमाणावर दाटीवाटीने झोपड्या वसलेल्या आहेत याठिकाणी ही दुर्घटना घडली. सुदैवाने येथील झोपड्या पावसाळ्या पूर्वीच खाली केल्या असल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही.प्रभाग समिती क्रमांक १ व २ चे सहाय्यक आयुक्त मकसूद शेख व माणिक जाधव हे घटनास्थळी पालिका आपत्कालीन पथकासह दाखल होत त्यांनी दुर्घटनाग्रस्त झोपड्या लगतच्या झोपड्यांचे ही नुकसान झाल्याने खबरदारीचा उपाय म्हणून येथील तीन कुटुंबियांना नजीकच्या पालिका शाळेत तात्पुरते स्थलांतरित केले आहे. शहरात नागाव गायत्री नगर, नूरी नगर, राम नगर, नवी बस्ती, नेहरूनगर, साठे नगर, फुले नगर, अजमेर नगर, पटेल कंपाऊंड या ठिकाणी हजारो झोपड्या डोंगर उतारावर आहेत. त्यांना पावसाळ्यापूर्वी खबरदारी म्हणून नोटीस बजावून या परिसरात बॅनर पोस्टर लाऊन नागरिकांना खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या अशी माहिती सहाय्यक आयुक्त मकसूद शेख यांनी दिली आहे.शहरविकास विभागा कडून मिळालेल्या माहितीनुसार शहरातील ८५० घरांना नोटीस बजावल्या असल्याचे समजते. अशा परिस्थितीत पालिका प्रशासनाने गांभीयार्ने पावले उचलण्याची गरज आहे.

# बोईसरमध्ये तीन मुलांचा बुडून मृत्यू

■**बोईसर** : राज्यात पाऊस मोठ्या प्रमाणात सुरू आहे.नद्या,धरणे, नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी आहे.त्यामुळे अशा तुडूंब भरलेल्या जलसाठ्यांमध्ये डुंबण्याचा मोह बऱ्याच जणांना आवरत नाही.त्यामुळे कधी कधी दुर्दैवी घटना होऊन अनेकांना जीव गमवावा लागतो. अशीच एक घटना बोईसरमध्ये घडली आहे.येथील एका खड्डयातील पाण्यात पोहण्यासाठी गेलेल्या चार पैकी तीन मुलांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. त्यात एका मुलाला वाचवण्यात यश आले आहे. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील दोन सख्ख्या भावांचा समावेश असल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. बोईसरमधील गणेश नगर परिसरात असलेल्या खासगी जागेतील खड्डयातील पाण्यात बुडून तीन अल्पवयीन शाळकरी मुलांचा मृत्यू झाला. शुक्रवारी (ता.२७ जून) दुपारी एक ते दीड वाजेच्या सुमारास ही घटना घडली. गणेश नगर परिसरातील झोपडपट्टीत राहणारी चार शाळकरी मुले दुपारच्या सुमारास भिंत ओलांडून घराच्या पाठीमागील असलेल्या मोकळ्या जागेतील पाण्याने भरलेल्या खड्डयात पोहण्यासाठी गेले होते. मात्र पोहताना यापैकी तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला असून एका मुलाला पाण्याबाहेर निघण्यास यश मिळाले.

# ७५ वर्ष संकलित राहणार गुन्हेगाराची ओळख

■**पालघर** : पालघर जिल्हा पोलीस दलात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत ह्यमोजमाप संकलन युनिटह्चा शुभारंभ करण्यात आला आहे. यामुळे एखाद्या घटनेतील आरोपीने पोशाख अथवा चेहरा याचे वेशांतर करून दुसरा गुन्हा केल्यास त्या गुन्ह्यातील तांत्रिक, फोटो, व्हिडिओ यावरून मोजमाप संकलन युनिट द्वारे नमूद गुन्हेगारांची तात्काळ ओळख पटविण्यास ७५ वर्षापर्यंत मदत होणार आहे.पोलीस अधीक्षक कार्यालय पालघर येथे विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, संजय दराडे यांच्या हस्ते मोजमाप संकलन युनिटचे उद्घाटन करण्यात आले आहे.

फौजदारी प्रक्रिया (ओळख) कायदा २०२२ या कायद्यांतर्गत राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभाग नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे सर्व जिल्हा स्तरावर मोजमाप संकलन युनिट स्थापित करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. या प्रणालीद्वारे भारतातील राज्यांमधील सर्व जिल्हे, सर्व कारागृह प्रशासन एकमेकांना जोडण्यात आलेली आहेत. मोजमाप संकलन युनिटमध्ये गुन्हेगारी प्रकरणांमध्ये सहभागी असलेल्या अटक आरोपींचे भौतिक आणि जैविक माहिती (डेटा) चे संकलन, साठवणूक आणि विश्लेषण करण्यास अधिकृत करण्यात आलेले आहे.

कायद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम १९२० या जुन्या कायद्यांतर्गत न्यायालयाने एक वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा ठोठावलेले दोषी तसेच अंतर्गत




चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या आणि नंतर सोडून दिलेल्या व्यक्तींच्या हातापायाचे ठसे आणि फोटो जमा करण्यात येत होते. त्यात आधुनिकीकरण करुन, फौजदारी प्रक्रिया ओळख कायदा २०२२ या कायद्यानुसार स्थापित करण्यात आलेल्या मोजमाप संकलन युनिटमध्ये जिल्ह्यातील अटक आरोपींचे रेटीना, हातापायांचे ठसे, शरीराचे मोजमाप, शरीरावरील ओळखीच्या खुणा, व्रण, सर्व दिशेमधील फोटो व त्याची वैयक्तीक माहिती संकलीत करुन ती माहिती गुन्हे तपासीक अधिकारी, अमंलदार यांना त्यांच्या ई मेल आयडीवर तात्काळ पाठविली जाईल. तसेच इतर माहिती सुमारे ७५ वर्षे संकलीत राहणार असल्याने त्यामुळे प्रथम गुन्हा करणारे आरोपीने त्याचा पोषाख अथवा चेहरा यांचे वेषांतर करुन दुसरा गुन्हा केल्यास त्या गुन्हयातील तांत्रीक, फोटो, व्हिडीओ यावरुन मोजमाप संकलन युनिट द्वारे नमुद गुन्हेगारांची तात्काळ ओळख पटविण्यास मदत होईल. या उद्घाटन कार्यक्रमास पालघर पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, पोलीस उप अधीक्षक (गृह) संगिता शिंदे अल्फोन्सो, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा प्रदिप पाटील तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार हजर होते.

# नालासोपाऱ्यात एकाच संस्थेच्या २ शाळांना धमकीचा ई-मेल

■**विरार** : नालासोपारा पश्चिमेतील श्रीप्रस्था परिसरातील एकाच संस्थेच्या दोन शाळांना अज्ञात व्यक्तीकडून ई-मेलद्वारे बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बुधवारी २५ जून रोजी पहाटे ४ वाजून २६ मिनिटांनी राहुल इंटरप्रायझेस आणि मदर मेरी या एकाच संस्थेच्या शाळांच्या मुख्याध्यापकांना ही धमकी देणारा ई-मेल प्राप्त झाला होता. सकाळी शाळा सुरू होण्याच्या आधीच मुख्याध्यापकांनी हा मेल पाहिल्यानंतर तातडीने शाळा प्रशासन सतर्क झाले. सकाळी ७ वाजता शाळा भरण्यास सुरुवात झाली होती. मात्र, मेलमधील धमकी गांभीर्याने घेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांसोबत परत घरी पाठवले. त्यामुळे शाळा परिसरात आणि परिसरातील पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

घटनेची माहिती मिळताच, वसई-विरार महापालिकेचे अग्निशमन विभाग, नालासोपारा पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले होते. मात्र दुपारी १ वाजता श्वान पथक आणि बॉम्ब शोध तज्ञांनी शाळेचा संपूर्ण परिसर तपासायला सुरुवात केली. शाळेचा परिसर मोठा असल्याने तपासणीस बराच वेळ लागला. तब्बल सहा तासांच्या कसोटीच्या तपासणीनंतर कोणतीही संशयास्पद वस्तू अथवा स्फोटक साहित्य आढळून आले नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. पोलिसांनी सदर ई-मेल कुठून पाठवण्यात आला, त्याचा तपास सुरू केला असून, सायबर गुन्हे शाखेच्या मदतीने याबाबतचा शोध घेतला जात आहे.गेल्या काही दिवसांपासून वसई-विरार आणि मिरा-भाईंदर परिसरात शाळांना अशा प्रकारच्या धमक्या मिळण्याचे प्रमाण वाढले आहे. मागील दहा दिवसांमध्ये अशा दोन घटना घडल्या असून, त्यामुळे पालक आणि शाळा प्रशासन चिंतेत पडले आहे.



**मेलमध्ये काय म्हटले ?**

या स्फोटाचा उद्देश इमारतीचे नुकसान करणे आहे. त्यामुळे कोणतीही जीवितहानी होऊ नये म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांचे दुपारी २ वाजेपर्यंत तात्काळ स्थलांतर करावे. हा स्फोट ८०० बेस आरडीएक्स फ्यूज व रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्फोट घडवण्यात येईल, असे या मेलमध्ये म्हटले आहे.राम मंदिरच्या कारणास्तव आम्ही शाळेची इमारतीची हानी करणार आहोत, आम्हाला जीवितहानी करायची नाही असे त्यात सांगितले असल्याचे शाळेचे व्यवस्थापक अध्यक्ष लल्लन तिवारी यांनी सांगितले आहे.

# अवैध मद्य वाहतुकीवर उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

■**डहाणू** : पालघर जिल्ह्यात परराज्यातून होर्णाया अवैध मद्य वाहतुकीवर आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या डहाणू आणि भरारी पथकाने संयुक्त कारवाई केली. २५ आणि २६ जून २०२५ रोजी करण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत तीन वेगवेगळ्या ठिकाणी धाड टाकून १५० बॉक्स विदेशी मद्य आणि तीन वाहने जप्त करण्यात आली. तसेच या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण जप्त मुद्देमालाची किंमत ३३ लाख ३५ हजार ८० रुपये इतकी आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळालेल्या खात्रीलायक माहितीच्या आधारे दादरा-नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशात विक्रीसाठी नेण्यात येर्णाया मद्याच्या अवैध वाहतुकीवर पाळत ठेवण्यात आली होती.

यानंतर सापळा रचून डहाणू व जव्हार तालुक्यात तीन ठिकाणी धाडसत्र राबवण्यात आले.यावेळी ठाकरपाडा (दापचरी), अहमदाबाद महामार्ग, डहाणू , मेढा पाटीलपाडा (ओझर रस्ता), जव्हार आणि जामसर हिरडपाडा रोड, जव्हार या तिन्ही ठिकाणांहून एकूण १५० बॉक्स विदेशी मद्य जप्त करण्यात आले.तर १५० बॉक्स विदेशी मद्याची किंमत १०,३५,०८० रुपये असून सर्व मुद्देमालासह एकूण किंमत ३३,३५,०८० रुपये इतकी आहे.या प्रकरणी रसिक किसना भोये (रा. खरोंडा सोनारपाडा, जव्हार) आणि दिनेश पांडू नडगे (रा. हिरडपाडा, जव्हार) यांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई आयुक्त डॉ. राजेश देशमुख (राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र), सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त प्रदीप पवार, अधीक्षक गणेश बारगजे व उपअधीक्षक ऋषिकेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.




या मोहिमेत निरीक्षक सुनिल देशमुख (डहाणू), निरीक्षक अरुण चव्हाण (भरारी पथक), दुय्यम निरीक्षक विश्वजीत आभाळे, राजेश शिंदे, व्ही. के. आबनावे, कमलेश पेंदाम तसेच जवान सत्यवान चोरघे, संदीप अहिरे, ओंकार शेजवळ, अमोल नलावडे, प्रतिक गांगुर्डे व शशिकांत पाटील यांनी सक्रिय सहभाग घेतला. सध्या या गुन्ह्यांचा तपास निरीक्षक सुनिल देशमुख आणि निरीक्षक अरुण चव्हाण करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००01४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com